# संत : कालोचित धर्मसंस्थापक

– डॉ. सौ. सुनंदा खेरडे, अमरावती

❖❖❖

**संतकार्याचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी धर्माला कालोचित स्वरुप दिले आणि जनताजनार्दनाला धर्माचार प्रवण केले. संत हे सदैव प्रवृत्तीवादीच असतात आणि मानवकल्याण, विश्वकल्याण हेच त्यांचे जीवनकार्य असते. संत ना एका प्रदेशाचे असतात, ना एखाद्या जातीचे असतात. आपणच त्यांना आपल्या स्वार्थासाठी संकुचित करीत असतो.**

❖❖❖

यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदाऽत्मानं सृजाम्यहम् ॥
परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम्
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे ॥

मानवसमाजात जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानी येते व अधर्माची भरभराट होते, तेव्हा तेव्हा अधर्माच्या पुरस्कर्त्यांना मागे सारून सज्जनांचे संरक्षण व धर्ममूल्यांचे प्रतिष्ठापन करण्यासाठी ईश्वरी शक्ति अवतीर्ण होते. या गीता-वचनात इतिहासाचे एक महान सत्य साठविलेले आहे. ''जगातील समाज-सुधारणेच्या कार्याचा व तत्त्वज्ञानाचा वृत्तांत पाहिल्यास असे दिसून येते की, जेव्हा समाजातील थोडया व्यक्तींचा स्वार्थ बहुसंख्य जनतेला भरडून काढू लागतो, तेव्हा त्या स्वार्थाच्या प्रतिकारांचे तत्त्वज्ञान जन्मास येऊन त्याच्या प्रभावाने समाजधारणेला नवे बहुसंख्य जनतेच्या सुखाचे वळण लागते.'' त्यासाठी उठल्यासुटल्या देवच अवतरतो, असे मानण्याचे कारण नाही. ''देव आणि भक्त दुजा नाही विचार,'' असे म्हणणाऱ्या संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी स्वच्छ सांगून ठेवले आहे की, ''देवासी अवतार। भक्तासी संसार। दोहींचा विचार एकपणे'' – अर्थात् ज्यासाठी देवाचा अवतार असतो त्यासाठीच भक्तांचा संसार असतो. ''धर्मरक्षावयासाठी। करणे आटी आम्हासी'' या श्रीसंत तुकोबारायांच्या व ''जैं धर्माची वाट मोडे। अधर्माची शीग चढे। तैं आम्हा येणे घडे। संसार स्थिती'' या श्रीसंत एकनाथांच्या उद्गारांनी तर या निष्कर्षावर शिक्कामोर्तब करून ठेवले आहे की, संत हेच धर्मरक्षक होत.

''संतांच्या विभूति धर्मलागी अवतरती'' – नाथ याचा अर्थ संत रूढ धर्मांचे संरक्षण करीत सुटतात, असे मात्र नव्हे.

''देशकालसमयावरती।
ऋषि नेते होउनि येती परिवर्तन धर्मा देती॥''

या उक्तीत संत तुकडोजी महाराजांनी हीच गोष्ट सुस्पष्ट केली आहे. रूढ धर्मकवच फोडून तत्त्व प्रकाशित करणे, अर्थात् धर्माला समयोचित वळण देऊन जीवनमूल्यांचे संरक्षण करणे हेच ऋषींचे व तत्स्वरुप संतांचे महत्कार्य होय!

''योग्य काळी महापुरुष, ऋषि सामान्य जनांत जन्म घेतात व त्या काळच्या परिस्थितीला अनुरुप अशी समाजरचना म्हणजे स्मृती निर्माण करतात'' – असे स्वामी विवेकानंदांनीदेखील म्हटले आहे. कोणताही मनुष्य, मग तो क्रांतिकारक, थोर पुरुष का असेना, देशकालाच्या मर्यादेतच बहुतांशी आपले आयुष्य गतिमान करीत असतो. तो एकप्रकारे त्या देशकालाचा प्रतिनिधी असतो. तथापि ''थोरांची थोरवी पूर्वपरंपरेच्या विचारसरणीत, लोकोद्धाराच्या तळमळीने काही नवी दिशा स्वाचरणशुद्ध स्पष्टोक्तीने दाखविण्याच्या उद्योगात साठविलेली असते'' – हे विसरता येत नाही. महाभारतातील यक्षप्रश्नाचे येथे स्मरण होणे स्वाभाविक आहे. यक्षाने धर्मराजाला ''का दिक्?'' (दिशा कोणती?) असा प्रश्न करताच धर्मराजाने मार्मिकपणे उत्तर दिले – ''संतो दिक्'' – संत हेच खरी दिशा होत. समाजजीवनाला देशकालाच्या मर्यादा ओळखून उद्धाराची योग्य दिशा दाखविणारे जीवनमूल्य-रक्षक होकायंत्र म्हणजे संत!





## संत : करुणामूर्ति लोकशिक्षक

**गतिरात्मवतां संत: संत एव सतां गति: ।**
**असतां च गति: संतो न चा संत: संतां गति: ॥**

ज्ञानी व सज्जन यांनाच नव्हे, तर दुर्जनांनादेखील संत हेच प्रगतीचा, सुखशांतीचा लाभ करून देणारे असतात. देवावतार दुर्जनांचा संहार करील, परंतु मातृहृदयी हे त्यांचे दुर्जनत्व घालवून त्यांनादेखील संरक्षणच देतात, हे विशेष ! कारण- सर्वत्र ही दयावंत: संत: करुण-वेदिन: । याप्रमाणे ते करुणेची केवळ मूर्तीच असतात. अज्ञ समाजाचा कळवळा तर त्यांच्या हृदयात सदा ओसंडतच असतो. 'संतमायबाप कृपावंत' हे 'उद्धाराया जन जडजीवा ।' यासाठीच 'अवतार' घेत असतात, असे जे श्रीसंत तुकारामांनी म्हटले आहे ते अक्षरश: सत्य आहे. एकनाथांनीही असेच म्हटले आहे-

**जडजीवांचा उद्धार । संत करिती निर्धार ।**
**पापी दोषी जैसे तैसे । लाविले कासे आपुलिया ॥**

ऋग्वेदात अग्निला 'सन्त्य' शब्द लावलेला आढळतो तोच शब्द संत या रूपाला आला असावा. संत हे अग्नीप्रमाणे प्रकाशदायी, पण शीतल आहेत. म्हणूनच ''मार्तंड ते तापहीन'' या शब्दांनी श्री संत ज्ञानेश्वरांनी संतांचा गौरव केला आहे. ''नृणां अंतस्तमोहारी । साधुरेव न भास्कर: ।'' मनुष्याच्या आंतरिक अंध:काराचा नाश सूर्य नव्हे तर संतच करू शकतात. कारण ''जो जाणेल भगवंत । तया नाम बोलिजे संत ।''

संत म्हणजे केवळ देवभक्त नव्हे. ''संत म्हणजे देवाचा भक्त हे समीकरण अर्वाचीन आहे. संत म्हणजे सत्पुरुष. लोकांना आपल्या आचरणाने शुद्ध व्यवहाराचा धडा घालून देणारे जे कोणी ते संत-साधु अशी या शब्दांची प्राचीन व्याख्या आहे.''* ''लोकोद्धाराकरिता तळमळणाऱ्या व ईर्षेने झटणाऱ्या व्यक्तीला मध्ययुगीन काळात 'संत' ही पदवी देण्यात आली.''

**निमज्ञोन्मज्ञतां घोरे भवाब्धौ परमायनम्**
**सन्तो ब्रह्मविद: शान्त: । नौर्दृढेवाप्सु मज्जताम् ॥**

अर्थात् ब्रह्मविद् असे शांतचित्त संत हे भवसागरातील तारकनौका आहेत. ''आत्मज्ञाने चोखडी । संत जे माझी रुपडी'' ते ज्ञानयज्ञ करणारच ! परंतु लोकांना केवळ ब्रह्मप्राप्तीचा मार्ग दाखवण्यासाठीच ते आहेत, असे मात्र नव्हे. संत हे केवळ परलोकाकडे डोळे लावून बसलेले नसून ऐहिक जीवनात मानवसमाजाला योग्य 'दिशा' दाखवणे, हेही त्यांचे काम आहे. कारण 'संत तेथे विवेक असणेचि की' 'धर्मो धारयते प्रजा' या सर्वमान्य व्याख्येनुसार समाजाचे धारण पोषण, सुस्थिती व प्रगति ज्यायोगे होऊ शकेल; अशा जीवनमूल्यांचे रक्षण व सक्रिय मार्गदर्शन ही संतांची जबाबदारी आहे. 'स केलेनेह महता योगो नष्ट: । या गीतोक्तीप्रमाणे कालप्रभावाने लोकोद्धाराचा मार्ग मलीन झाल्यास 'झाडू संतांचे मारग ।' म्हणणारे संतच त्यांचे पुनरुज्जीवन करतात. याचेच नाव धर्मसंस्थापना ! हा धर्म लोक शिकतात तो संतांच्या जीवनदर्शनातून !

**एथ वडिल जे जे करिती ।**
**तेया नाव धर्मु ठेविती ।**
**तोचि एर अनुष्ठिती ।**
**सामान्यसकल ॥**
**हे ऐसे असे स्वभावे ।**
**म्हणोनि कर्म न संडावे**
**विशेषे आचरावे । लागे संती ।''**

समाजाच्या मार्गदर्शनासाठी संतांना कटाक्षाने समयोचित व तत्त्वनिष्ठ असे धर्माचरण करावे लागते, इतकेच काय, पण समाजाची अवस्था अथवा पात्रता लक्षात घेऊन त्यासाठी आपल्या उच्च अवस्थेतून कधीकधी खालीही यावे लागते व समाजाशी समरस होऊन क्रमाक्रमाने त्याला वर न्यावे लागते. ही गोष्ट ज्ञानदेव – तुकारामांनी अगदी सुस्पष्ट केली आहे-

**''मार्गी अंधासरिसा । पुढां देखणाहि चाले जैसा ।**
**अज्ञा प्रगटावा धर्मु तैसा जाणतेन ॥''**
**''अर्भकाचे साठी पंते हाती धरिली पाटी**
**तैसे संतजगी क्रिया करूनी दाविती अंगी''**

'संत' शब्द सत्पासून व्युत्पादिला जातो. विश्वाच्या मुळाशी असणाऱ्या 'सत्' तत्त्वाचा त्रिकालाबाधित सच्चिदानंदाचा अनुभव घेणारे संत ''सद्भावे साधुभावेच'' या वचनानुसार सरळ, सात्विक व ऋजु जीवनाचे असतात. त्यातूनच महासामर्थ्य व लोकवशीकरणदेखील त्यांना लाभलेले असते.

**''जयाचेनि बोले धर्म जिये ।**
**दिठी महासिद्धीते विये''**

**असा त्यांचा अधिकार !** पण असे असले तरी
**शान्तो महान्तो निवसान्ति सन्तो ।**
**वसन्तवल्लोकहितं चरन्त: ।''**

शांत असलेले संतमहंत वसंत ऋतुप्रमाणे लोकजीवन

फुलविण्यासाठी रात्रंदिवस झटत असतात. ''जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टविती उपकारे।'' ''तुका म्हणे गुण चंदनाचे अंगी। तैसे तुम्ही जगी संतजन॥'' याप्रमाणे जगत्कल्याणासाठी चंदनवत् काया झिजविणारे संत हे 'दु:खितांचे सेलभागी। जिणे जयाचे।' अशा भूमिकेतून रंजल्या गांजल्यांना आपले म्हणतात.

**'किंबहुना दिवसराती।**
**पुढिलांचे सुखउन्नती**
**आणित आणित स्वार्थी।**
**प्रवेशिजे'**

अशाप्रकारे 'जगाचे पापताप फेडित।' सागरास मिळणाऱ्या गंगेसारखे ते समाजाचे सुखसामर्थ्य वाढवीत वाढवीत आपल्या स्वरूपसागरी रममाण होतात. अशा संतांना समाजविन्मुख कसे म्हणता येणार ?



## संत प्रवृत्तीवादी की निवृत्तीवादी

परंतु संत म्हटला की तो निवृत्तीवादी, असे मानणारा विद्वानांचा एक वर्ग आहे. संत निवृत्तीवादीच होते, असे श्री. म. माटे म्हणतात. डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांचेही तेच मत ! ते म्हणतात- ''मोक्षधर्मावरी ही जी अतिरेकी, एकांतिक, इहनिरपेक्ष निष्ठा तिचेच नाव निवृत्ती असे आहे. ही आत्यंतिक निष्ठा हा भारतभूमीस एक शाप आहे. त्यामुळेच तिचे कर्तृत्व वरचेवर खची होत असते.'' इतिहासाचार्य श्री. वि. का. राजवाडे यांनी तर सर्वप्रथम संतांना 'संताळे' हा निंदाव्यंजक शब्द लावून आणि त्यांना निवृत्तीवादी व निराशावादी ठरवून त्यांनी देश बुडविल्याचा टाहो फोडला होता. परंतु कालांतराने त्यांचे मत बदलले व तसे त्यांनी नमूदही केले. तथापि डॉ. अ. ना. देशपांडे आजही सोज्ज्वळभावाने ठासून लिहितात की, ''केवळ महाराष्ट्रातलेच नव्हेत, केवळ भारतातलेच नव्हेत, तर सगळ्या जगातले संत... एकच विचार सांगतात... तो म्हणजे निवृत्तीचा... मला संतवाङ्मयात मुख्यत: निवृत्तीचेच विवरण व समर्थन प्रतीत झाले !'' परंतु ही निवृत्ती त्यांना टाकाऊ अथवा घातक वाटत नाही. व्यक्तिजीवनाच्या सर्वांगीण सफलतेला दोन्ही मार्ग आवश्यक आहेत... प्रवृत्तीचा आणि निवृत्तीचा... वीरतेचा आणि विरक्तीचा... असेच त्यांनी पुढे आपले मत प्रकट केले आहे.

प्रा. न. र. फाटक, प्रां. गं. बा. सरदार, श्री. बा. रं. सुंठणकर आदि भिन्न विचारसरणीच्या विद्वानांनी संतांना प्रवृत्तीवादी ठरविले आहे व कारणमीमांसा भिन्न रीतीने करूनही स्वराज्य-स्थापनेची भूमिका तयार करण्याचे श्रेय संतांना देऊन टाकले, हे विसरता येत नाही. याबाबत सर्वप्रथम अत्यंत व्यापक व समतोल बुद्धीने समालोचन करून प्रभावी आवाज उठविला, तो न्या. रानडे यांनी आपल्या Rise of Maratha Power या ग्रंथात. डॉ. शं. दा. पेंडसे, ह. भ. प. प्रा. सोनोपंत दांडेकर, डॉ. दि. का. गर्दे, श्री. ल. रा. पांगारकर आदि विद्वानांनीही, 'संतांनी आपल्या आध्यात्मिक भूमिकेवरून समाजाला अत्यंत उपयुक्त व पोषक असे कार्य केले आहे,' हे मान्य केले.

वस्तुत: प्रवृत्ती आणि निवृत्ती यामध्ये उजेड-अंधारासारखा भेद नाही. प्रवृत्ती म्हणजे स्वार्थमय कर्मे आणि निवृत्ती म्हणजे नि:स्वार्थ कर्मे ही दृष्टी ठेवली तर निवृत्तीवादाला नावे ठेवण्याची गरजच राहत नाही. देवाच्या एकांतिक भक्तीत मुरून सर्वांभूती ईश्वर असल्याच्या बुद्धीने, जे दु:खी, दरिद्री, दीन, गांजलेले असतील त्यांच्या उद्धाराचे कार्य ज्यांनी केले ते संत जगांविषयी उदासीन होते, असे म्हणणे वस्तुस्थितीला सोडून आहे. देह नश्वर आहे, प्रपंच मिथ्या आहे इत्यादि तत्त्वज्ञान

संतांनी सांगितले ते कर्तव्यपराङ्मुख होण्यासाठी नव्हे, तर मोहात गुरफटून न जाता तत्परतेने कर्तव्य करण्यासाठी आणि अविनाशी सुखाकडे दृष्टी वळवण्यासाठी! ''एरवी हा मृत्युलोकच आहे. जन्मला प्राणी वाचत नाही तरी हिंमत धरून मारतामारता मरावे,'' हे संतांच्या शिकवणुकीत मुरलेल्या गौतमाबाईने मल्हारराव होळकरांना उद्देशून काढलेले उद्‌गार काय निराशावादी आहेत? निवृत्तीवादी विचार काय कर्तव्याला मारक ठरले आहेत?

संतांची निवृत्ती ही अनुभवण्यासाठी आणि प्रवृत्ती ही आचरणासाठी असते. ते निवृत्तीनिष्ठ प्रवृत्तीचे पुरस्कर्ते आहेत. निवृत्ती हे त्यांच्या प्रवृत्तीचे अंतिम लक्ष्य आहे. 'पुण्यालागी प्रवृत्ती। पापालागी निवृत्ती' हा त्यांचा एक प्राथमिक निष्कर्ष आहे. तर ''तेथ प्रवृत्ती तरुचीया बुडी। दिसती निवृत्ती-फळाचिया कोडी'' हा त्याहून उच्च असा दुसरा निष्कर्ष! ''जना लावावे सत्पथी। हेचि साधुची पै कृती। एका जनार्दनी साधू। हृदयी वसे ब्रह्मानंदु॥'' या अभंगातील प्रथम चरणात निवृत्ती सूचित केली आहे. संत म्हणजे प्रवृत्ती-निवृत्तीचा योग्य समन्वय. ''ते भोगावरी न विटती। त्यागावरी न उठती। आपुलिये सहजस्थिती। स्वये वर्तती सर्वदा।'' अशी त्यांची समतोल सहजावस्था! केवळ चैनीसाठी प्रपंच ही प्रवृत्ती संतांना मान्य नाही, तसेच केवळ देहजगाचा व कर्तव्याचा कंटाळा ही निवृत्तीही त्यांना रुचत नाही. प्रवृत्ती-निवृत्तीचा असला वरवर अर्थ करणाऱ्यांची संभावना ते याच शब्दांत करतील की- ''प्रवृत्ती निवृत्ती दोन्ही मुळी नाही। कल्पनेनं पाही भ्रमताती।'' संतवाङ्मयाचा अभ्यास करणारे अलिकडे याच वादाला प्राधान्य देऊन या आवर्तात उलटसुलट भ्रमण करताना दिसतात; ही चाकोरी आता सोडली पाहिजे. ''प्रवृत्तीनिवृत्तीच्या कचाट्यातून आपली संतवाङ्मय याची टीकावर निघाली पाहिजे. शास्त्रशुद्धता, अनुभवसिद्धता व सर्वकालीन हितकरपणा याच कसोट्यांवर संतांच्या शिकवणीचे व कार्याचे मूल्यमापन झाले पाहिजे'', प्रा. श्री. मा. कुलकर्णी यांची ही सूचना खरोखरच स्वागतार्ह आहे.

## सार्वदेशिक संत

भारतातल्या संतांनी व तत्त्ववेत्यांनी उदार व मानवतावादी दृष्टिकोन ठेवून जीवन आणि धर्म या दोहोंशी परमार्थाची सांगड घातली आहे. या दुःखमय जगात संत आणि तत्त्वज्ञ आत्मविश्वासाने जीवन जगून गेले, हे श्री. न. चि. जोगळेकरांचे उद्‌गार यथार्थ आहेत. 'बृहत् तत् ब्रह्म', म्हणजे जे सर्वांत व्यापक अथवा विशाल तेच ब्रह्म, अर्थात् ईश्वर स्वरूप. त्या ईश्वराचे भक्त तेच ब्रह्ममूर्ति संत. त्यांचा दृष्टिकोन 'हे विश्वचि माझे घर' अथवा 'अखिल विश्व मंदिर माझ्या आत्ममूर्तीचे' असा विश्वव्यापक असणे स्वाभाविक आहे. मानवतावाद हा त्यांच्या पोटात सामावणारा आहे. आपणच चराचर असल्याचा अनुभव घेणारे संत हे सर्व विश्वाच्या हितासाठी आपापल्या परीने व आपापल्या ठायीच कार्य करीत असतात. देश, पंथ, पक्ष, वर्ण, भाषा, भूषा इत्यादींच्या सीमा त्यांच्या दृष्टीपुढे वितळून जातात. वास्तविक मानवी भावनेची ही अत्युच्च झेप म्हटली पाहिजे. ही विश्वशांतीचा सुदृढ पाया ठरू शकेल. परंतु 'अयं निजः परोवेती' ही संकुचित भावना सोडून 'वसुधैव कुटुंबकम्' वृत्तीने वागणाऱ्या या महात्म्यांनाही दोष द्यायला काही चिकित्सक कमी करीत नाहीत. श्री. वि. ल. भावे यासारख्या विद्वानानेदेखील 'आमुचा स्वदेश। भुवनत्रयावरी वास' म्हणणाऱ्या संताग्रणी तुकोबांना ''महाराष्ट्रधर्म वाढवावा'' अशी गर्जना करणाऱ्या समर्थ रामदासांहून भोंगळ व निंदास्पद ठरवावे, हे आश्चर्य आहे. यात श्री. भावे यांनी, 'न सोसवे आता न धरवे धीर। पीडिता हे राष्ट्र पाहुनि जग' या वचनातील 'राष्ट्र' शब्दाकडे दुर्लक्ष करून जसा श्री संत तुकारामांविषयी अपसमज पसरविला, तसाच ''आई, चिंता करितो विश्वाची'' या समर्थवचनातील 'विश्व' शब्दाकडे दुर्लक्ष करून रामदासांचाही अधिक्षेप केला आहे. श्री. भावे यांचे हे विचार संतांची भूमिका न जाणल्याचे द्योतक आहेत. ''संतांनी आपपरभाव विसरायला शिकवून देशाचा घात केला, असे मानणारा व म्हणणारा वर्ग हल्लीच्या जनतेमध्ये फार मोठा आहे जे संतांच्या कार्याची पूर्वग्रह टाकून परीक्षा करतील त्यांना संतांसंबंधातील यासारखे आरोप सोडून द्यावे लागतील'', हे प्रा. न. र. फाटकांचे उद्‌गार याबाबतीत लक्षणीय आहेत. श्रीकृष्ण हा 'अखिल ब्रह्माण्ड नायक असला तरी तो गोकुळचा कान्हा' असतोच; तद्वत् संत हे विश्वव्यापी धारणेचे विश्वमानव असले तरी त्याचवेळी ते आपल्या प्रदेशाचे प्रतिनिधीही असतात. म्हणूनच संत एकनाथ व गुरुगोविंद सिंह विधर्मी आक्रमकांशी लढू शकले, महात्मा गांधी व तुकडोजी महाराज विदेशी सत्ताधीशांपुढे झुंझारवृत्तीने उभे ठाकले.

'देशकालवस्तु भेद मावळला। आत्मा निर्वाळला विश्वाकार', असा देशकालातीत आत्मानुभव संपादित केलेले संत हे सर्वच देशांचे असतात आणि सर्वच देश त्यांचे असतात. सर्व जगातील अत्युच्च कोटीचे संत हाच अनुभव घेतात. त्यामुळे संतासंतांमध्ये भेद करण्याचे तत्त्वतः कारण उरत नाही; मग ते उपनिषद काळातील ऋषि असोत की

पुराण-काळातील भक्त असोत, इतिहास काळातील आचार्य असोत की आधुनिक काळातील संत असोत. स्वराज्य-सिद्धीकारांनी म्हटले आहे की-

**'कोऽपि वर्णाश्रमाचारनिष्ठापरां।**
**मुग्धबाल प्रमत्तोपमश्चापरे।**
**रागिणो भोगिनो योगिनोश्चेतरे**
**ज्ञानिनी लक्षतेऽनैकरुपस्थिती: ॥'**

समर्थ रामदासांनी जणु याचाच अनुवाद केला आहे की-

**'साधु दिसती वेगळाले।**
**परि ते स्वरुपी मिळाले॥**
**अवघे मिळोनि एकचि झाले।**
**देहातीत वस्तु'**



अर्थात्, बाह्यत: विभिन्न देशभाषेतील व वेषभूषेतील खरेखुरे संत हे 'देहातीत वस्तु' झाल्याने अंतरी एकरुपच असतात. 'आध्यात्मिक अनुभव हा राष्ट्र, धर्म, जाति इत्यादी भेदातीत असून सर्वकाळातील व सर्वदेशातील आत्मसाक्षात्कारी पुरुषांचे अनुभव सर्वसाधारणपणे सारखेच असतात. हे उपनिषदकाळातील ऋषि, ज्ञानेश्वर-कबीर-मीराबाई-पुरंदरदास इत्यादी हिंदी संत यांच्या अनुभवांची तुलना केली असता सहज दिसून येईल.

संतांच्या अनुभवांप्रमाणेच त्यांचे हृद्‌भाव आणि प्रमुख उपदेशदेखील बहुतांशी समान असतात. 'मने एका मातीची' या निबंधात डॉ. वि. भि. कोलते यांनी म्हटले आहे- ''संतांच्या जीवनात, आचार-विचारात, आध्यात्मिक साधनेत आपापल्या परीने अभिव्यक्तीची विविधता असली तरी मुळात एकात्मता आढळते. कारण त्यांची मने एकाच मातीतून घडली आहेत... जणु एकमेकांच्या अंत:करणाचे ते प्रतिध्वनीच होत.''

''झाडाची पाने, फुले व फळे ही वस्तुत: एकच असून व त्या सर्वांचे अंतिम कार्य एकच असूनही कारणपरत्वे तीं भिन्न भिन्न दिसलात. तसेच या संतांचे झालेले आहे.''

जगातील संतसंस्कृती ही भारतीय संत-संस्कृतीशी मिळतीजुळती आहे. तशीच भारतीय संस्कृतीही समन्वयशील असल्याने तिच्या विशाल व सर्वसमावेशक स्वरुपात अनेकविध प्रादेशिक संस्कृती गुण्यागोविंदाने नांदत आल्या आहेत. बंगाली, गुजराथी, मराठी, कानडी, तेलुगु, पंजाबी इत्यादी प्रादेशिक संस्कृतींनी त्या त्या भूमीचे व लोकांचे गुण आत्मसात करून काहीसा वेगवेगळा आकार धारण केला असला तरी भारतीय संस्कृतीच्या सर्वंकष मूलतत्त्वांवरच त्यांची उभारणी व विकास झाला असल्यामुळे त्यांच्यात एकात्मता कायम आहे.

'अग्निर्यथैको भुवनं प्रविष्टो। रुपं रुपं प्रतिरुपो बभूव'- या उपनिषद् वाक्याप्रमाणे एक दिव्य भारतीय संस्कृतीच प्रादेशिक संस्कृतीच्या स्फुल्लिंगमधून प्रकट झाली असे म्हणायला प्रत्यवाय नाही. बदलत्या परिस्थितीत संतमहात्म्यांनी नव्या दृष्टीने प्रादेशिक संस्कृतींना घडण दिली असली तरी भारतीय संस्कृतीची एकसूत्रता अनुस्यूत राहिल्यामुळे भारतीयता व प्रादेशिकता यांचा संघर्ष न होता त्यांच्यात परस्परपूरकता कायम राहिली आहे. विशाल भारतातील विभिन्न प्रदेशांत उदयास आलेल्या संतमहंतांचा, ही एकात्मता कायम राखण्याच्या कामात 'सिंहाचा वाटा' आहे, हे विसरता येणार नाही. भक्तिपंथाच्या प्रभावामुळेच प्रादेशिक भाषांचा उत्कर्ष व प्रादेशिक संस्कृतींचा अभ्युदय विशेषत्वाने झाला आहे. हे सारे घडले ते गुप्तसाम्राज्याच्या -हासानंतर-मध्ययुगात. वस्तुत: वेदकालीन ऋषीदेखील संत असले तरी मध्ययुगालाच संतचळवळीचा उदयकाळ समजण्यात येते. या दृष्टीने या मर्यादित काळाचा मागोवा घेणेच इष्ट व आवश्यक ठरते.

# श्रीमद् भगवद्गीतेची महती

- ह. ल. रानडे

❖❖❖

**श्री साईबाबांना भक्त दत्तावतार समजत, तसेच अनेक भक्त बाबांना श्रीकृष्णाचाच अवतार मानतात. श्रीसाईसच्चरित पोथीमध्ये, अध्याय ३९, ओवी क्रमांक २९ ते १०७ पर्यंत, बाबांनी श्री चांदोरकर यांना गीतेतील एका श्लोकाचे केलेले निरूपण आपण वाचतो. साईबाबांचा गीतेवर केव्हढा अधिकार होता, हे त्यावरून लक्षात येते. श्रीमद् भगवद्गीता हा काव्य आणि जीवन तत्त्वज्ञान म्हणून अलौकिक ग्रंथ आहे. अशा ग्रंथाचीमहती सांगताहेत बोधकथाकार श्री. ह. ल. रानडे.**

❖❖❖

श्रीमद्भगवद्गीता हा भगवान् गोपालकृष्णांच्या मुखकमलातून विनिसृत झालेला एक अभूतपूर्व ग्रंथ. त्याच्या थोरवीचे किती वर्णन करावे ? आपल्या सुदैवाने आपल्याला ते 'गीतामाहात्म्य' वर्णनात पहावयास मिळते, ते असे... धरणीमातेने भगवान् श्रीविष्णूंना प्रश्न विचारला की, जर प्रत्येक माणसाला त्यांचे प्रारब्ध भोगावेच लागते, तर ते भोगत असतानां त्याच्याकडून निखळ (अव्यभिचारिणी) भक्ति कशी काय होऊ शकेल ? त्यावर श्रीविष्णूंनी उत्तर दिले, ''जो माणूस गीतेच्या अभ्यासात सदैव मग्न राहील तो प्रारब्ध भोगत असतानाही सुखी, आनंदी राहू शकेल, एवढेच नव्हे, तर तो कर्मबंधनातूनसुद्धा मुक्त होऊ शकेल.'' ''प्रारब्ध गीताभ्यासरत: सदा। स मुक्त: स सुखी लोके कर्मणा'' ॥



शिवाय महापापेपण त्याला स्पर्श करू शकणार नाहीत. शिवाय गीतापठण जेथे चालते तेथे प्रयागादि सर्व तीर्थे हात जोडून उभी रहातात. त्यामुळे प्रयागतीर्थात स्नान केल्याचे पुण्य प्राप्त होते -

**''गीतायाः पुस्तकं यत्र यत्र**
**पाठ: प्रवर्तते।**
**तत्र सर्वाणि तीर्थानि**
**प्रयागादीनि तत्र वै ॥''**

शिवाय अशा ठिकाणी सर्व देव, ऋषि, योगी, गोप, गोपी सहाय्यासाठी हजर असतात. एवढेच नव्हे, तर भगवान् श्रीविष्णू असेपण सांगून जातात की तेथेच माझा मुक्कामपण असतो.

**यत्र गीताविचारश्च पठनं**
**पठनं श्रुतम् ॥**
**तत्राहं निश्चितं पृथ्वि**
**निवसापि सदैव हि ॥**

आणखी या गीताग्रंथाचे महत्त्व असे की, ही गीता मानवाला ब्रह्मस्वरूपाप्रत नेण्याएवढी सामर्थ्यशाली विद्यादेवता आहे,

''गीता मे परमा विद्या ब्रह्मरुपा न संशयः।'' गीतेवर विश्वास ठेवून त्याचे नित्य पठण व त्याप्रमाणे जे आचरण करतात त्यांना परमसिद्धि प्राप्त होऊ शकते. गीतेच्या नित्य पठनानें निष्क्रिय माणूसही कार्यप्रवण होऊ शकतो. ''गीतापाठ समायुक्तो मृतो मानुषतां व्रजेत्''। माणसाने गीतेचे अंत:काळी जरी स्मरण केले तरी तो जीवन्मुक्त होऊ शकेल.''

गीतेच्या द्वितीय महात्म्यात आणखी असेपण सांगितले आहे की, ती शिकल्यावर मग बाकीची शास्त्रे शिकण्याची मुळीच जरूरी नाही, कारण गीता सा क्षात् गोपालकृष्णाच्या मुखातून स्त्रवलेली आहे -

**''गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रविस्मरैः।**
**या स्वयं पद्मनाभस्य मुखपद्माद्विनिसृता ॥''**

गीतारूपी गंगाजल प्राशन केल्यावर पुनर्जन्माच्या येरझाऱ्यापण टळतात **''गीता गंगोदयुं पीत्वा पुनर्जन्म न विद्यते''**। शिवाय गीतेचे एवढे माहात्म्य असावयाचे कारण म्हणजे भगवान् गोपालकृष्णाने सर्व उपनिषदरूपी गायींचे स्वतः करून त्यातून गीतामृतरूपी दुग्ध काढले. मग असे अमृतरूपी दूग्ध सेवन करावयास मिळाल्यावर मुक्तिशिवाय दुसरे काय बरे मिळणार ? **''सर्वोपनिषदो गावः दोग्धा गोपालनंदनः। पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥''**

गीतेची एवढी थोरवी असल्यामुळेच भगवान् शंकरांना ती अतिशय प्रिय होती व तिच्या पठनात ते अनेकदा मग्न असत. एकदा पार्वतीने त्यांना विचारले कीं, तुम्ही गीतापठनात एवढे काय रमता ? तेव्हा श्रीशंकर उत्तरले, ''प्रिये पार्वती, तू जशी प्रत्येक वेळी निरनिराळी रूपे घेऊन माझ्याकडे येतेस व मला आकर्षित करतेस, अगदी त्याचप्रमाणे ही गीता प्रत्येक वेळी मला निरनिराळा अर्थ दाखवून मला मोहिनी घालते.'' ''या गीताग्रंथाची थोरवी, स्वये शंभू विवरी तेथ भवानी प्रश्न करी, हे गीतातत्त्व कैसे.'' शंकर उद्गारले, **''देविजैसे स्वरूप तुझे। तैसे हे नित्य नूतन देखिजे गीतातत्त्व।''**

मग ही भगवद्गीता महेशांनासुद्धा जर एवढी आकर्षित करीत असेल, ती शिकल्यानंतर जर दुसरे शास्त्र शिकण्याची जरूर नसेल, तिचे पठन केल्यावर सर्व देवदेवतांचे दर्शन होत असेल, सर्व तीर्थांचे स्नान घडत असेल व या जीवाच्या येरझाऱ्या थांबून मोक्षप्राप्ति होत असेल तर मग अशा असामान्य ग्रंथात सांगितले आहे तरी काय, ते आपण जरा विस्ताराने पाहू या ना !

या ग्रंथात श्रीकृष्णप्रभूने मानवाला असे काही संदेश दिले आहेत की त्यांचा प्रत्येक मानवाने शांतचित्ताने विचार केला व त्याप्रमाणे ते आचरणात आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला तर सामान्य माणूस भूदेवच बनू शकेल. तो लौकिक यशाबरोबर पारलौकिक यशाचापण मानकरी होईल.

मानव या गीताग्रंथातील पहिला संदेश आपण पाहू. गीतेने अर्जुनाच्या माध्यमातून अखिल मानवजातीस पहिला महत्त्वाचा संदेश जर कोणता दिला असेल तर तो म्हणजे भित्रेपणा, नेभळटपणा, कचखाऊपणा अजिबात टाकून देण्याचा. अर्जुन हा क्षत्रिय व चांगला योद्धा असूनसुद्धा ऐन युद्धाच्यावेळी प्राप्त कर्तव्यापासून परावृत्त होत होता. कौरव-पांडवांच्या युद्धाच्यावेळी कुरुक्षेत्रावर दोन्ही सैन्यामध्ये श्रीकृष्णप्रभूंनी अर्जुनाचा रथ जेव्हा उभा केला तेव्हा आपल्याला कोणाबरोबर युद्ध करावयाचे आहे हे पाहिल्यावर अर्जुन गर्भगळित झाला व त्याचे लढण्याचे अवसानच गळाले. कारण त्याला समोर शत्रू न दिसता त्याचे काका-मामा वगैरे नातेवाईक व गुरुजन दिसू लागले व त्यांच्याबद्दल त्याच्या मनात अनुकंपा निर्माण झाली व अज्ञानामुळे तो मोहग्रस्त झाला व त्यामुळे त्याला कर्तव्य-अकर्तव्य याबाबत संभ्रम निर्माण झाला. तो आपले कर्तव्य तर पार विसरून गेला. एवढेच नव्हे तर तो गोपालकृष्णाला म्हणाला, ''प्रभो ! या युद्धात जर मी माझ्या आप्तांना ठार केले तर मी पापाचा धनी होऊन नरकात पडेन कीं ! काय करावे हे मला काहीच सुचत नाही. मला उभे रहाण्याचीसुद्धा ताकद नाही. श्रीकृष्णा ! तू मला जरी ठार केलेस तरी मी या कौरवांना मारण्याचे धाडस मुळीच करणार नाही.'' **'सीदान्ते मम गात्राणि मुखं च परिशुष्यनि।' 'गाण्डीवंस्त्रंसते हस्तान् त्वक्चैव परिदह्यते।'** ''न कांक्षे विजयंकृष्ण न च राज्यं सुखानि च'' ''एकान्त हन्तुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन।'' गोपालकृष्णा ! कौरवांचा निःपात केल्यावर धर्मच लोप पावेल की ! सर्वत्र अनीतिचे साम्राज्यच पसरणार नाही का ? म्हणून राज्यलोभाने मी स्वबांधवांशी युद्ध करून कायमचा नरकवास मुळीच पत्करणार नाही. एवढे बोलूनच अर्जुन थांबला नाही तर तो



हातातील गांडीव धनुष्य रथात टाकून देऊन चक्क डोके धरून रथात खाली बसला - **''एवमुक्त्वाऽर्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत्। विसृज्य सशरं चापं शोकसंविग्न मानसः।''**

युद्धाचे संकट अगदी समोर उभे ठाकले असता त्याचा धैर्याने व प्राणपणाने मुकाबला करण्याऐवजी अर्जुन क्षत्रिय असूनही युद्धभूमी सोडून भित्र्या भागूबाईप्रमाणे पळून जाण्याची भाषा जेव्हा बोलू लागला तेव्हा गोपालकृष्णापुढे अगदी बाका प्रसंग उभा राहिला. पण गोपालकृष्ण प्रभू असल्यामुळे त्या परिस्थितीत ते मुळीच गडबडले नाहीत. उलट त्यांनी त्यावेळी अर्जुनाला चांगलेच खडसावले. ते म्हणाले, ''अर्जुना तुला काही समजते का नाही ? ही कोणती वेळ आहे याचे तुला भान तरी आहे का? अरे, अशा समरप्रसंगाच्या वेळी युद्धभूमीतून पळपुट्याप्रमाणे पळून जाण्याची अवदसा आत्ताच तुला कोठून आठवली? ''कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम्। अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन॥ अरे, तू शूर वीर, पराक्रमी! तू अनेक युद्धे जिंकणारा ना! मग हे हृददौर्बल्य, नामर्दपणा, भित्रेपणा आत्ताच तुझ्यामध्ये कसा काय निर्माण झाला. अरे! संकटे समोर उभी ठाकली असता त्यांचा मुकाबला करण्यासाठी, त्यांच्यापुढे पहाडाप्रमाणे प्राणांची बाजी लावून उभे रहावयाचे, का भित्र्या भागूबाईप्रमाणे पळून जावयाचे ? तू जर असे केलेस ना! तर लोक तुझी भित्रा, पळपुटा, नेभळट वगैरे संबोधनांनी अपकीर्ति करतील. मग तुझी ही नाचक्की टाळण्यासाठी तुला तोंड लपवून बसावे लागेल, तेव्हा अर्जुना, हा तुझा नपुंसकपणा टाकून दे. तो तुझ्यासारख्या योद्ध्याला मुळीच शोभत नाही. ''क्लैब्यं मा स्म गमः पार्थ, नैतत्त्वय्युपपद्यते।''
शिवाय, अर्जुना, तुला ज्यांच्याशी युद्ध करावयाचे आहे ते तुझे नातेवाईक आहेत हे आताच तुला उपजले काय ? तसेच, अर्जुना, हेपण लक्षात ठेव की प्रत्येकाला मृत्यू केव्हा ना केव्हातरी निश्चित येत असल्यामुळे या कौरवांचा मृत्यू अगदी निश्चित आहे. शिवाय हे तुझे कौरव पापी, दुराचारी व सज्जनांचा छळ करणारे असल्यामुळे तू जरी यांचा नाश करावयास तयार झाला नाहीस तरी मला ते काम करावेच लागेल. मग क्षत्रियाचे कर्तव्य म्हणून तूच त्यांच्याशी समरभूमीवर युद्ध करून त्याचे श्रेय (CREDIT) का मिळवत नाहीस ? तू जर तसे केले नाहीस तर कर्तव्यच्युतीचे पाप तुला लागेल व त्यामुळे तुला सद्गतीपण मिळणार नाही. शिवाय हेपण लक्षात ठेव की तू जरी युद्धात मारला गेलास तरी तू कर्तव्य करता-करताच मरण पत्करल्यामुळे तुला स्वर्गप्राप्ति होईल. युद्ध जिंकलेस तर राज्यावरपण बसशील. तेव्हा दोन्ही बाजूंनी विचार केलास तरी तुझा फायदाच होईल. तेव्हा अर्जुना, उठ! हे क्षुद्र मनोदौर्बल्य एकदम झटकून टाक व युद्धास तयार हो. **''हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं, जित्वा वा भोक्ष्यसे महीम्। तस्मादुत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः॥''**

''अर्जुना! तू हेपण लक्षात ठेव की जीवनात प्रत्येक मानवावर निरनिराळ्या प्रकारची संकटे येत रहाणारच. पण त्यांना घाबरून जाऊन पळून जाण्यात कोणता पुरुषार्थ आहे.'' अरे, धैर्याने त्यांचा मुकाबला करण्यातच खरे पौरुष आहे.

संकटांना न धाबरता त्यांना शौर्याने सामोरे जाण्यातच खरा पुरुषार्थ आहे, हे सांगणारी गीतेची ही केवढी थोर शिकवण आहे! पण पराक्रम गाजविण्याचा हा संदेश भरतभूमीत कुरुक्षेत्रावर श्रीकृष्णप्रभूंनी देऊनसुद्धा आपण भ्याड, कचखाऊ वृत्तीचे बनत आहोत, ही शोकांतिकाच नव्हे का!

गीतेचा दुसरा महत्त्वाचा संदेश म्हणजे आपल्या वाट्याला आलेले काम बिनतक्रार, आनंदाने व अगदी मनापासून करण्याचा. श्रीकृष्णप्रभूंनी मानवाला, तू नुसते काम कर म्हणून सांगितले नाही, तर ते काम कशात्ऱ्हेने करावयाचे हेपण सांगून टाकले. भगवान् गोपालकृष्ण अर्जुनाला सांगतात, ''अर्जुना, अरे ! तुझ्या वाट्याला जे कर्म येईल ना, ते कमी दर्जाचे आहे असे तू मुळीच समजू नकोस. कारण जीवन सुव्यवस्थित वाटण्यासाठी प्रत्येक कर्म आवश्यक आहे आणि म्हणूनच मी अनेक प्रकारची कर्मे निर्माण केली. म्हणून तू तुझे प्राप्त कर्तव्य बिलकुल तक्रार न करता, प्रेमाने, प्रामाणिकपणे, निष्ठेने, निरहंकार बुद्धीने, निरपेक्ष बुद्धीने व आपण कर्म कसे करतो, हे भगवंत पहात आहे, या भावनेने ते करीत रहा. शिवाय ते कर्म शेवटी भगवंताला अर्पण करावयाचे आहे, हेपण ध्यानात ठेव. कर्म जर शेवटी भगवंताला अर्पण करावयाचे तरमग ते कसेतरी, अंग चोरून केलेले कसे बरे चालेल ! व मग असे कर्म भगवंताला तरी आवडेल का ? अर्जुना ! अशी सर्व पथ्ये पाळून तू तुझे निहित कर्तव्य करीत राहिलास ना की तेच कर्म तुला माझी प्राप्ति करून देईल. मग त्यासाठी तुला दुसरे तिसरे काहीच करावयास नको. शिवाय अर्जुना ! हेपण लक्षात ठेव की हे कर्म कोणालाच चुकलेले नाही. मी ज्यावेळी सृष्टि निर्माण केली त्याचवेळी प्रत्येक मानवाच्या मागे त्याने करावयाचे कर्म लावून दिले. तसे ते दिले नसते तर मानव जीवनात मुळीच रमला नसता. मग अर्जुना, कर्म जर अपरिहार्य आहे, तर मी वर सांगितल्याप्रमाणे तू तुझे कर्म करावयास नको का ? अरे, त्यामुळे तुझाच फायदा होणार नाही का ? शिवाय असे काम सर्वच लोकांना आवडेल व त्यामुळे तू लोकादरास पण पात्र होशील. पण अशा कर्माबद्दल तू अहंकार मात्र बाळगता कामा नये. कारण तुझ्यामध्ये माझे चैतन्य वास करीत असल्यामुळे मीच तुझ्याकडून कर्म करवून घेतो, हे ध्यानात ठेव. म्हणून कर्म करताना कर्तृत्वद अजिबात होऊ देऊ नकोस. तसेच कर्म करताना तू त्यापासून आपल्याला काही मिळेल अशी अपेक्षासुद्धा ठेवू नकोस. तशी अपेक्षा जर का तू ठेवलीस तरमग असे कर्म मला आवडणार नाही. शिवाय याबाबत अर्जुना ! मला सांग की कर्म करताना तू कर्म व त्यापासून मिळावयाचे फल याचा एकाचवेळी कसा काय विचार करू शकशील ? कारण माणसाचे मन एकावेळी एकच विचार करू शकते. दुसरा विचार त्यावेळी आला की मनाची द्विधास्थिति होते व मग कामात लक्ष लागत नाही. मग असे लक्षपूर्वक न केलेले काम चांगले कसे काय वठेल ? म्हणून तू तुझे कर्म करताना फलाचा विचार डोक्यातून अजिबात काढून टाक व कर्म करण्यावर तुझे लक्ष केन्द्रित कर. शिवाय आणखी असे की, तू कर्म करून त्याचे फळ जर घेतलेस तर तुझ्याजवळ त्याचे काय उरेल ? काहीच नाही. मग कर्म म्हणजे नुसता विनिमयच (EXCHANGE, BUSINESS) झाला नाही का ? हे लक्षात ठेव की तू प्राप्त कर्तव्याचा धंदा (BUSINESS) मांडलेला नाहीस. कारण विहित कर्म हा भगवंताने आपल्याला दिलेली एक पवित्र व मंगल देन आहे व ती दिल्याबद्दल आपण त्यांचे कृतज्ञ रहावयास हवे. म्हणून त्या कर्माचे पावित्र्य, मांगल्य व शान राखण्यासाठी आपण त्या कर्तव्याला त्याच तोलामोलाने सांभाळावयास नको का ? म्हणून तू कर्म करण्यावरच तुझा भर ठेव व त्यावरील फलाचा अधिकार संपूर्णपणे सोडून दे. थोडक्यात, तू तुझे कर्म करून बाजूला हो.'' **''कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।''**

''आता अर्जुना ! तू मग असे म्हणशील की कर्माच्या फलावर जर अधिकार ठेवावयाचा नाही तरमग कर्म तरी का व कशासाठी करावयाचे ? नुसते स्वस्थ बसले तर नाही का चालणार ! पण अर्जुना ! ही तुझी विचारसरणी तर्कद्रष्ट आहे, कारण फल मिळो वा न मिळो, मानवाला कर्म केल्याशिवाय गत्यंतरच नाही (''न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यषत्रातः ।'' ''न हि कश्चित् क्षणमपि जावु निष्ठ त्य कर्मकृत ।'' ''शरीरयात्रापि च ते न प्रसिंद्ध्येत कर्मणा ।''). म्हणून फल मिळणार नाही म्हणून कामच करावयाचे नाही हा विकृत विचार तू तुझ्या मनाला शिवू देऊ नकोस. (माते संगोऽस्तु अकर्मणि), कारण अर्जुना ! या कर्मातूनच जनकादि राजांना संसिद्धि मिळाली आहे. तुलाही ती तशीच मिळेल. या कर्माच्या आचरणानेच तुझी चित्तशुद्धीपण होईल आणि त्यामुळे तुझा माझ्याकडे येण्याचा मार्ग मोकळा होईल. म्हणून निष्काम कर्म ही माझी पूजा, हीच माझी उपासना, हे लक्षात ठेवून तू तुझ्या कर्मापासून च्युत होऊ नकोस (स्वकर्मणा तपम्यर्च सिद्धिं विन्दति मानवः ।). शिवाय अर्जुना ! तू कर्म कर म्हणून तुला सांगून मी कर्म न करता मुळीच स्वस्थ बसत नाही. अरे ! मला जरी काही मिळवावयाचे नाही ना तरीसुद्धा मी सतत कार्यमग्न



असतो. कारण मी जर स्वस्थ बसलो तर जनता माझेच अनुकरण करणार नाही का ? (**''न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन । नानवाप्तमवाप्रव्यं वर्त एवच कर्मणि''**) म्हणून तू स्वत:ला सतत कर्मात झोकून दे'' (**''कुरु कर्मैव तस्मात्वं तस्मादसक्त: सततं कार्यं कर्म समाचर ।''**) सतत कर्म करण्याचा आग्रह, ते बिनतक्रार, अत्यंत प्रेमाने, आनंदाने व पूजेप्रमाणे करण्याची सवय, त्यातून काहीही न मिळण्याची शक्यता, पण तरीसुद्धा ते अगदी मनापासून, निष्ठेने व अहंकारविरहित बुद्धिने करीत रहाणे आणि असे कर्म शेवटी भगवंताला अर्पण करावयाचे आहे, ही दृष्टि, ही कर्मयोगाला लावलेली चपखल विशेषणे केवढी क्रांतिकारी व त्यामुळे कर्मयोगाला अत्युच्च पदी नेऊन बसवणारी ! त्यामुळे मानवी जीवनात दूरगामी परिणाम घडवून आणणारी नव्हेत का ? समस्त बंधु-भगिनींनी वर वर्णन केल्याप्रमाणे कर्मयोगाचे आचरण करण्याचा दृढनिश्चय केला तर कार्याची तपासणी करण्यासाठी पर्यवेक्षक (SUPERVISOR) लागणार नाही. पगारवाढीसाठी कारखान्यात संप, मोर्चे वा टाळेबंदी होणार नाही. जोतो माणूस आपल्या वाटणीस आलेले काम कमी दर्जाचे न मानता ते अगदी प्रामाणिकपणे व मनापासून करताना दिसेल. कामाचे ढीग साचणार नाहीत. शिवाय निष्काम कर्मयोगामुळे लोक पैशाच्या मागण्या करीत बसणार नाहीत. त्यामुळे सरकारला तुटीचे अंदाजपत्रक सादर करण्याची वेळपण येणार नाही. एवढेच नव्हे, तर भरपूर काम केल्यावरच कामगार आपला पगारावरचा हक्क सांगणारा असल्यामुळे कारखान्यांना तोटा होणार नाही. त्यामुळे भारताचे आर्थिक चित्रच एकदम बदलून जाणार नाही काय ?

गीतेचा आणखी एक महत्त्वाचा संदेश म्हणजे वासनात्यागाचा भगवान् प्रभू अर्जुनाला सांगतात, ''अर्जुना ! ही विषयवासना फारच धोकादायक आहे. ती माणसाला केव्हा विनाशाकडे नेईल, हे सांगता येत नाही. या वासनेने भल्याभल्यांना धुळीला मिळविले आहे व त्यांना कायमचे जन्म-मृत्यूच्या फेऱ्यात अडकवून ठेवले आहे. त्या फेऱ्यांतून बाहेर पडण्याची प्रत्येकालाच इच्छा असते. पण ते वासनात्यागाशिवाय शक्य नसते. म्हणून प्रत्येकाने या वासनापाशातून मुक्त होण्याचा प्रयत्न करावयास हवा. त्याने आपली वासना इन्द्रियसुखांकडे न वळविता हळूहळू ती भगवंताकडे वळवावी. कारण वासनाद्वारे मिळणारे सुख हे शाश्वत सुख नाही. ते भगवंताकडे कदापि नेत नाही. शिवाय हे वासनासुख प्रथम प्रथम सुखदायक वाटते, पण परिणामी ते दु:खदायक ठरते. शिवाय ते सुख इन्द्रियांची विषय भोगण्याची क्षमता आहे तोपर्यंतच टिकते. माणसाचे वय वाढू लागले की ती ती इन्द्रिये दुर्बल होतात व मग त्यांना त्या वासनांची पूर्ति करता येत नाही. आणखी हे पण लक्षात असू दे की, वासना उपभोगाने कधीकधी होण्याऐवजी त्या जास्त जास्त वाढतच जातात. ''हविषा कृष्णवर्त्मे भूय एव अभिवर्धते''. शिवाय ही वासना मनात उत्पन्न झाली की ती पूर्ण होतेच असे नाही. तसे जर झाले तर ती पूर्ण न करण्यामागे कोण होते त्याचा शोध सुरू होतो व मग मनामध्ये क्रोध, द्वेष, मत्सर, असूया वगैरे नको असलेले विकार उत्पन्न होतात, चित्तक्षोभ वाटतो, मनाचा संयम (तोल) नाहीसा होतो व मग अशा माणसाच्या हातून अविवेकाने व्हावयास नको ती दुष्कृत्ये घडतात व त्यामुळे त्याचा विनाशपण होऊ शकतो. **''ध्यायजो विषयात् पुंस: संगस्तेषु कुपजायते। संगात् संजायते काम: कामान् क्रोधोऽकिजायते ॥ क्रोधान् भवनि संमोह: संमोहान् स्मृतिविभ्रम: । स्मृतिभ्रंशात् बुद्धिनाशो, बुद्धिनाशान् प्रणश्यति ॥''** त्याचा नुसता विनाश होऊनच ही गोष्ट थांबत नाही तर त्याने केलेली दुष्कृत्ये त्याच्या पुनर्जन्मास कारणीभूत ठरतात. म्हणजेच या येरझाऱ्यांतून त्याची मुक्तता

होत नाही. म्हणून अर्जुना ! तुझ्या मनामध्ये भगवद्वासनेशिवाय दुसरी कोठलीच वासना उत्पन्न होणार नाही याची तू काळजी घे. तसेच तुला चांगला जन्म येण्याच्या दृष्टीने तू तुला मिळालेला जन्म सत्कृत्य, सत्संग व सद्वासना यात व्यतीत कर, म्हणजे तुझ्या वासना नाहीशा होतील व मग तुला मुक्ती मिळविण्यासाठीची पात्रता प्राप्त होईल. तू तुझ्या वासना जर तुझ्या अंत:काळापर्यंत जागृत ठेवल्यास तर त्या वासनांच्या पोटी पुनर्जन्म असल्यामुळे तुला सद्गति प्राप्त होणार नाही. म्हणून तू अंतकाळीसुद्धा माझे स्मरण ठेव व ते तसे रहाण्यासाठी तू वासनांचा त्याग करावयास शीक. वासनारहित, आसक्तिरहित आचारधर्म हा मानवाला त्याच्या जीवनातील अत्युच्च शिखर गाठून देण्यास उपयुक्त ठरतो, हा श्रीकृष्णप्रभूंनी मानवाला दिलेला केवढा उत्तुंग व दिव्य संदेश ! यापेक्षा गीतेने मानवास आणखी काय द्यावयास हवे ?

गीतेमध्ये भगवान् अर्जुनाला आणखी असेपण सांगतात की तू तुझे कर्म व्यवस्थित होण्यासाठी तुझ्या इंद्रियांना वळण लाव व त्यांना तुझ्या ताब्यात ठेव, कारण तू जर तसे केले नाहीस तर ही अवखळ इंद्रिये तुझे काम बिघडवून टाकतील. ही इंद्रिये आपापल्या विषयांमागे सतत धावू नयेत म्हणून प्रथम मन हे इंद्रिय आवरावयास हवे. हे मन सदैव इंद्रियांना धावावयास सांगत असते. त्यासाठी तू या मनाला सैरावैरा भटकू देऊ नकोस. हे मन अतिशय चंचल, बंडखोर व ताब्यात आणण्यास कठीण आहे - ''चंचलं हि जन: कृष्ण प्रमाधि बलवत् दृढम्'' ''पण ही गोष्ट अशक्य मात्र नाही. त्यासाठी तू प्रथम वर सांगितल्याप्रमाणे मनाची विषयाकडील धाव कमी कमी करत आण. मनामध्ये विषयांबद्दलचा विचार न आणता भगवंताविषयीचा विचार मनात ठेव, म्हणजे मग वासनांचे प्राबल्य कमी होऊन त्या मनाला भगवंताचा छंद लागेल आणि एकदा का मनाला भगवंताची गोडी लागली म्हणजे तुझे काम झाले. म्हणून मनाला ताब्यात ठेवण्यासाठी तू नैराश्य (वासनात्याग, ते मन ताब्यात ठेवण्याचा सतत अभ्यास कर - ''अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते'' - एकदा का हे मन ताब्यात आले की तुझे अर्ध्याहून अधिक काम झाले. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास तू इंद्रियांचा दास न होता त्यांचा स्वामी हो. तू मनाला ताब्यात ठेवण्यात यश मिळविलेस म्हणजे मग तुला ते उलटे करून 'नम' करून - त्याला भगवत्स्मरणात गुंतवून ठेवता येईल व मग ते तेथे स्थिर होईल. हे मन निश्चल, निश्चिंत, निवांत होण्यासाठी त्याला सत्संगति, सदाचार, सद्विचार व सत्ग्रंथांचे वाचन यांचे खतपाणी घालत रहा. त्यामुळे मग अशा मनाला मान-अपमान, सुख-दु:ख, जयापजय याचे काहीच वाटणार नाही व या द्वंद्वांपासून ते मुक्त झाल्यामुळे त्याला जीवन्मुक्तीपर्यंतची मजल अगदी सहज मारता येईल.

माणसातील विवेक सतत जागृत रहाण्यासाठी व त्याच्या हातून अविचाराने कोणतेही दुष्कर्म घडू नये म्हणून प्रत्येकाने आपले मन ताब्यात ठेवण्याचा व त्यामुळे सामाजिक शांतता व सलोखा राखण्याचा गीतेचा हा केवढा बहुमोल संदेश !

श्रीमद्भगवद्गीतेचा आणखी एक महत्त्वाचा संदेश म्हणजे मनोवृत्ति अगदी शांत ठेवण्याचा. गोपालकृष्ण अर्जुनाला सांगतात, ''अर्जुना तू तुझी चित्तवृत्ति अगदी स्थिर केलीस व मनाचा क्षोभ करणारे प्रसंग टाळलेस की तुझ्या हातून तुझी सर्व कर्मे अगदी व्यवस्थित, चोख, बिनबोभाट व पटकन् पार पडतील. निर्वात ठिकाणी दिवा जसा शांतपणे जळतो (''यथा दीपो निवातस्थो तेङ्गते सोपमा स्मृता'') तसे तुझे मन योगयुक्त रहाण्यासाठी तू तुझ्या मनातून काम, क्रोध, लोभ, मद, मोह व मत्सर या षड्रिपूंची हकालपट्टी कर. लक्षात ठेव की हे षड्रिपू मानवाचे महाभयंकर शत्रू आहेत - ''**काम पष क्रोध रजोगुणसमुद्भव: । महाशनोमहापाप्या बिद्धि रम्य ते वैरिणम् ॥**'' या षड्रिपूंचा विटाळसुद्धा तुला होऊ देऊ नकोस. कारण काम, क्रोध व लोभ ही नरकाची तीन दारेच आहेत - ''त्रिविधं नरकस्मेदं द्वारं नरिनिमात्मन: । काम: क्रोध: तथा लोभस्तस्मादेनत् त्रयं त्यजेन् ।'' हे शत्रू तुझे लौकिक जीवनपण बरबाद करतील. तुझे मन अस्थिर राहिल्यास ते तुला ध्यानधारणेसपण बसू देणार नाहीत व ध्यानधारणा न झाल्यास तुला जीव-मुक्तीकडे कशी काय वाटचाल करता येणार !''

लौकिक व पारलौकिक जीवनाची यशस्वी वाटचाल करण्यासाठी आपले चित्त शांत, प्रसन्न व स्थिर ठेवण्याचा भगवन् गोपालकृष्णांचा हा संदेश अनमोल नव्हे का ?

सर्व ठिकाणी समत्व, भगवत्काम व आत्मौपम्ये दृष्टीने पहाण्याची वृत्ती आपल्याला भगवंताजवळ कशी नेते हेपण गीता आपल्याला विशद करून सांगते. ही गोष्ट स्पष्ट करताना भगवान् अर्जुनाला सांगतात, ''अर्जुना ! मीच ही सर्व सृष्टि निर्माण केली असल्यामुळे माझा अंश प्रत्येक प्राणिमात्रामध्ये आहे - ''**ममैवांशो जीवलोके**''.... ''**सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो ।**'' ''ईश्वर: सर्वभूतांना हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।'' म्हणून तू सर्वांना भगवत्स्वरूपच पहा. तसे केलेस म्हणजे तू



कोणाशी भांडणार नाहीस, कोणावर रागावणार नाहीस, कोणास फसवणार नाहीस, कारण त्यामुळे तू भगवंताबरोबरच भांडलास, त्याच्यावर रागावलास, त्याला फसवलेस असे होईल. अर्जुना ! अशातऱ्हेने तू तुझी दृष्टि विश्वव्यापक केलीस की मी तुला कधीच अंतर देणार नाही व तूपण माझ्यापासून कधीच दूर रहाणार नाहीस - ''यो मां पश्यति सर्वत्र सर्वंच पार्थ पश्यति। तस्याहं न प्रणश्यासि स च मे न प्रणश्यति ॥'' त्याचप्रमाणे तू सर्व ठिकाणी तुझे स्वत:चेच रूप पहात जा. म्हणजे मग तू कोणावरही कोणत्याच प्रकारचा अन्याय करणार नाहीस, कोणाचा द्वेष करणार नाहीस किंवा कोणाचे नुकसानपण करणार नाहीस कारण तसे केलेस तर तू तुझ्यावरच अन्याय केल्यासारखे व तुझेच नुकसान केल्यासारखे होईल - ''आत्मौपच्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन। सुखं ना यदि ना दुखं स योगी परमो मन:'' - तू माझ्याप्रमाणेच समदृष्टीचा झालास की मग तू सर्वांचाच आवडता होशील व त्यामुळे माझापण.'' **''समोऽहं सर्वभूतेषु न ये द्वेष्योऽस्ति न प्रिय: । ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥''**

या समत्वाच्या संदेशामुळे मानवाने आपले मन वैश्विक करण्याचा व आकाशाशी नाते जोडण्याचा केवढा हा भव्य व दिव्य संदेश !

जीवनामध्ये मानवाला अतिशय भेडसावणारी जर कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे मृत्यू. हा मृत्यू तर कोणालाच नको असतो पण तो येतो मात्र अगदी सर्वांनाच. त्याबाबतपण श्रीकृष्णप्रभूंनी अर्जुनाजवळ उहापोह केला. कौरवांसारखे आपले नातेवाईक व भीष्म-द्रोणाचार्यांसारखे आपले गुरू यांच्याशी युद्ध करून त्यांत त्यांना ठार मारून आपण पापाचे कसे काय धनी व्हायचं, हा अर्जुनाचा प्रश्न. त्यावर भगवान् अर्जुनाला सांगतात, ''अरे हे अर्जुना ! जो म्हणून जन्माला आला त्याला मृत्यू हा येणारच. मेलेल्यांनापण पुन: जन्म येणारच मृत्यू कोणशलाच टाळता येत नाही. म्हणून या मृत्यूची भीति बाळगून तू चिंताग्रस्त होऊन तुझ्या प्राप्त कर्तव्यापासून विचलित होऊ नकोस - ''जातस्य हि ध्रुवो मृत्यु: ध्रुवं जन्म मृतस्य च। तस्मादपरियार्थे न रवं शोचितुमर्हसि ॥'' **''अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे। गत्तासूनगतासूंश्च नानुशोचान्ने पंडिता: ॥''** अर्जुना ! मी हे जग जेव्हा निर्माण केले तेव्हा त्याच्या जन्माबरोबर मी त्याच्या विनाशाचीपण व्यवस्था केली. कारण अगदी उघड आहे. कारण तशी ती केली नसती ना तर केवढा अनवस्था प्रसंग निर्माण झाला असता ! या पृथ्वीतलावर उभे रहाण्यासाठी तरी जागा शिल्लक राहिली असती का ? म्हणून मृत्यू हा चुकविता येणार नसल्यामुळे तू कौरवांशी युद्ध करावयास अगदी नि:शंकपणे तयार हो. शिवाय तू जरी त्यांना ठार मारले नाहीस तरी मला मग ते काम करावे लागेल व मग कर्मापासून पळून गेल्याचे पातक मात्र तुझ्या पदरी पडेल. शिवाय अर्जुना ! तुला वाटतो तितका हा मृत्यू भयप्रद नाही. अरे, मृत्यू म्हणजे पहिला जीर्ण झालेला कपडा टाकून देऊन दुसरा नवीन धारण करणे होय किंवा जीर्ण झालेला देह टाकून दुसरा नवीन देह धारण करणे होय - ''वासांसि जीर्णानिह यथा विहाय, नवानि गृण्हाति नरोऽपराणि। तथा शरीरतणे विहाय जीर्णान्यन्याति संयाति नवानि देही ॥'' शिवाय हे शरीर जरी पडले तरी त्यात वास करणारे आत्मतत्त्व नाहीसे होत नसल्यामुळे व ते कर्मानुसार दुसऱ्या शरीरात प्रवेश करीत असल्यामुळे व ही घटना अपरिहार्य असल्यामुळे तू शरीरनाशाबद्दल वृथा शोक करीत बसून कौरवांशी युद्ध करणे टाळू नकोस.''

मृत्यूचे भय मनात अजिबात न ठेवता शेवटपर्यंत कार्यप्रवण रहाण्याचा हा गीतासंदेश किती महान आहे !

श्रीमद्भगवद्गीतेचा मुख्य उद्देश अखिल मानवजातीस





कार्यप्रवण करण्याचा व त्यातून आत्मोद्धार करून घ्यावयाचा हे सांगण्याचा. पण तरीसुद्धा गीता नुसता कर्ममार्ग सांगून थांबत नाही. त्या कर्मयोगाला भक्तिमार्गाचीपण जोड हवी असेपण ती सांगते. याबाबत अधिक स्पष्टीकरण करताना श्रीकृष्ण सांगतात, ''अर्जुना ! तुझ्या कर्ममार्गात जर भक्ति नसेल तर ते कर्म उठावदार होणार नाही. शिवाय हेपण लक्षात ठेव की हा भक्तिमार्ग म्हणजे काहीसा निराळा व आचरणात आणण्यास कठीण असेपण काही नाही. याबाबत तू कर्म करताना तुझे मन भगवंताच्या ठिकाणी ठेवावयाचे व ते कर्म मी करीत नसून माझ्याकडून भगवंत करवून घेत आहे ही भावना ठेवावयाची - ''मय्येव मन आधत्स्व, मयि बुद्धिं निवेशय।'' ''तस्मात् सर्वेषु कालेषु पापनुसार युध्यच'' - शिवाय तू तुझी सर्व कर्मे भगवंतासाठीच करीत रहा व ती सर्व त्यालाच अर्पण कर म्हणजे मग तू भगवंतापासून कधीच विभक्त (वेगळा) होऊ शकणार नाहीस व 'आवडता भक्त' ह्या पदवीस पात्र होशील. मग अशा भक्ताला संकटांची भिती वाटत नाही व मग तो कलिकाळाचे भयपण बाळगत नाही - ''मश्चित्तः सर्व दुर्गाणि मत्प्रसादात् तरिष्यसि।'' ''तेषामहं सपुद्धर्ता मृत्यू संसार सागरात्॥'' भगवंत हा भावाचा भुकेला असल्यामुळे कर्म करताना मानवाच्या त्यात किती भक्तिभाव आहे हे पहातो. मानवाचे कर्म जर भक्तीने ओथंबलेले असेल तर अशा भक्ताला तो आपल्यापासून कधीच विभक्त होऊ देत नाही. त्याच्या योगक्षेमाची सर्व काळजी भगवंत वहातो.''

**''भवन्यचेतास्सननं यो मां स्मरति नित्यशः।**
**तस्याहं सुलभं पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः।''**

**''मनन्या श्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते।**
**तेषा नित्याभियुक्त्यां योगक्षेमं वहाम्यहम्॥''**

**''मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।**
**मामेवैष्यसि सत्यंते प्रतिजाने प्रियोऽसि मे॥''**


भगवान् श्रीकृष्णप्रभूंचे भक्तावर एवढे प्रेम आहे की परमभक्ताची लक्षणे अर्जुनाला सांगताना त्यांना अगदी आनंदाचे भरते येते. ते अर्जुनाला सांगतात, ''अर्जुना ! जो कोणाचा द्वेष करत नाही, सर्वांशी मित्रत्वाच्या भावनेने वागतो, ज्याची ''मी, माझेपणा'' ही भावना गळून पडलेली असते, जो सुखदुःख समान मानतो, जो नित्य संतुष्ट असतो, जो योग्याप्रमाणे अगदी सतत स्थिरचित्त असतो, ज्याने मन व बुद्धि मला अर्पण केलेली असते, ज्याला पाहिल्यावर लोकांना आनंद होतो व ज्याला लोक भेटल्यावर आनंद वाटतो, जो अत्यंत शुद्ध अंतःकरणाचा आहे, जो आनंदाने हुरळून जात नाही किंवा दुःखाने खचून जात नाही, जो शत्रू-मित्र, मानापमान, निंदा-स्तुति सारखीच मानतो, जो कोठेही आसक्त होत नाही, ज्याला स्वतःचं घर नाही, (अनिकेत) म्हणजे विश्व हेच घर मानतो असे भक्त मला खूपच आवडतात.''

यावरून हे स्पष्ट होते की जी माणसे आपली आसुरी प्रवृत्ति टाकून वर वर्णन केलेले सात्त्विक प्रवृत्तीचे गुण अंगी बाणविण्याचा प्रयत्न करतात त्यांना भगवंताचे निकटचे सान्निध्य लाभते व त्यामुळेच शेवटी ते ब्रह्मपदी स्थिर होतात. त्यांना भगवंताचे निकटचे सान्निध्य लाभते व त्यामुळे शेवटी ते ब्रह्मपदी स्थिर होतात. मग याच जन्मात भक्तिमार्गाने वाटचाल करून जीवनाचे अंतिम ध्येय साध्य करण्याचा हा श्रीकृष्णप्रभूंनी गीतेत सांगितलेला सोपा असा मार्ग आपण आचरणात आणून भगवंताचे लाडके भक्त होण्याचा मान पटकावूया ना !

थोडक्यात, गीतेत सांगितल्याप्रमाणे भित्रेपणा टाकून, येणाऱ्या कोणत्याही संकटांचा धैर्याने मुकाबला करण्याचे ठरविल्यास, वाट्याला आलेले काम आनंदाने, तक्रार न करता, मनापासून व निःस्वार्थ बुद्धिने करावयाचे ठरविल्यास, इंद्रियांना वळण लावून मन ताब्यात ठेवल्यास, लौकिक वासनांचा त्याग केल्यास, मनाचा क्षोभ कधीच होऊ न दिल्यास, सर्वांच्या ठायी भगवत्भाव ठेवून त्यांच्याशी समत्व भावनेने वागल्यास, मृत्यू हा निश्चित येणार असल्यामुळे त्याची भीती अजिबात सोडून दिल्यास व भगवंताचा लाडका भक्त होण्यासाठी त्यानेच सांगितलेल्या दैवी गुणांचा अंगिकार केल्यास लौकिक जीवन सुख, शांति, समाधान व समृद्धिने करून तर जाईलच, पण पारलौकिक सुख व वैभव तुमच्यापुढे हात जोडून उभे राहील. मग अशा या अनुपमेय गीताग्रंथातील संदेशांचे आपण चिंतन, मनन व आचरण करून आपण आपल्या जीवनाचे सार्थक करून घेण्यास लगेचच सुरुवात करू या ना ! थांबायचे कोणासाठी व कशाला ?







## साईनामाचा डंका घुमतो

**(भक्तिगीत)**

साईनामाचा डंका घुमतो
भजन रंगले दरबारी
साई साई वदती नाचत डुलती
सहज समाधी संसारी ॥धृ०॥

दत्त दिगंबर योगी सुंदर
चरणी पादुका गर्जती
दंड कमंडलु त्याच्या हाती
कंठी माळा झगमगती
गंध केशरी शोभादायक
भक्तजनांचे मन चोरी ॥१॥

साईचरणांचा अगाध महिमा
श्रवणपठण करी साईलीला
प्रेमानंदी पूर्ण बुडावे
द्वैतभावही मावळला
साईरूपाचा धुंद सोहळा
ब्रह्मवीणेला झंकारी ॥२॥

अद्वैताची सत्य भावना
कल्पवृक्ष छायेखाली
सुखदुःखाचा खेळ संपला
अमृतात मुक्ती भिजली
जन्ममृत्यूचे तुटले नाते
नौका जाते पैलतिरि ॥३॥

– प्रा. योगेश्वर अभ्यंकर, नाशिक.




## साईनाथ-गुरु

साईनाथा तुम्हां मानिले मी गुरु
मग चिंता व्यर्थ मी कशाची करू

तुम्ही कामधेनु मी तव वासरु
ममता मी तुमची कशी विस्मरू

उधळे मन चौखूर दाही दिशा
भोग लालसेस्तव अहर्निशा

आवर घाली रे बा तूंच साईशा
तोडुनि मनाच्या सर्व मोहपाशा

चित्त माझे लागावे तव चरणी
काया वाचा सर्व कांही विसरुनि

रोमरंध्रे साईनामचि जपुनि
प्रार्थी तुम्हां साईदास आवर्जुनि

– ग. मु. कुळकर्णी, जयपूर.

## साईपूजन

साई माझ्या अभंगा
गोडी लाभो तुझिया नामाची।
शब्द भाव वहातो चरणी
आंस एक तव दर्शनाची ॥

अभिषेक कृतार्थ आसवांचा
शाल वहातो वात्सल्याची।
स्नेहभाव रंग फुलांचा
अर्पितो माला आत्मियतेची ॥

साई तुझिया समाधीस
धूपारती करितो तनमनधनाची।
षडविकाराचे ज्वलन होवो बाबा
मुक्ती मागतो जन्मफेऱ्यांची ॥

पंचारती लावितो आता
प्रभा फाको कृपा किरणांची।
पावन होवो मानव जन्म
याचना आम्हा भक्तांची ॥

साई साई म्हणूनी
हाक दीन दुबळ्यांची।
उब राहू दे संसारा
द्वारकामाईच्या धूणीची ॥

**– अशोक अर्घापुरे,** औरंगाबाद.




## दिव्यत्वाची प्रचिती

आला पहाटेचा वारा
शांति घेवुनिया घरा।
सुख झाले या मनाला
सुख झाले जाणिवेला ॥१॥

साईचीच ही करणी
नारळात वसे पाणी।
साथ देण्या जीवनाला
साई असे सोबतीला ॥२॥

प्रेमाची ही साईलीला
जीवा देई विरंगुळा।
सीमा नसे या प्रेमाला
जीवनाच्या अमृताला ॥३॥

साईमुखीच्या शब्दाला
लाभे प्रेमाचा जिव्हाळा।
भक्तासाठीचा सोहळा
शोभतसे दिव्यत्वाला ॥४॥

सारा जगाचा पसारा
नाही उसंत संसारा।
साईचाच जो जाहला
घोर नाही त्या भक्ताला ॥५॥

**– योगेश्वर अभ्यंकर**

## ऊररंग

काळ्याकभिन्न डोहांत
जवळी उमटे छाया
डोळ्यांतील काळी झोप
घेई काळी गंधमाया ॥१॥

हळूच हंसावे-रडावे
हृदयातील सोनकळा
अंतस्थ जळांतील सल
विसावा दावी संतमळा ॥२॥

ओंजळ भरूनी जीवन
फुलवावे देहीला रंग
जडावाला आले साजण
दिठीतील तो पांडुरंग ॥३॥

**– जी. सुरेशन्,** अमरावती.

## दत्तअवतार साई

दत्ताचा अवतार साई दत्तांचा अवतार
भरला भक्तांचा दरबार ॥धृ०॥

उद्धरण्या जन जन्म घेऊनी
शिरडीवासी स्थान जमऊनी
केला भक्तांचा उद्धार ॥१॥

निंबवृक्षातळी प्रगट होऊनी
वरातीमागुनी स्थानी येऊनी
दिधला पीडितांना आधार ॥२॥

ऊदीरूपी औषध देऊनी
रोगी अनेक बरे करूनी
दीपावलीदिनी पणत्या पेटऊनी
मसजिद मंदिर एक करूनी
केले अनेक चमत्कार ॥३॥

साई दत्तांचा अवतार

**– रत्नाकर द. पाटील,** चिंचवड.




## मजसी पाव रे साई

मजसी पाव रे आता,
माझ्या सद्‌गुरू, साईनाथा।
अवतरला तू शिरडीमध्ये,
नाना लीला केल्या तेथे।
नानावल्ली, तात्या कोते,
म्हालसापति, बायजा माते,
तू उद्धरिले दाता
मजसी पाव रे आता,
माझ्या सद्‌गुरू साईनाथा ॥१॥

नेले मेघा, परम पदासी,
शामास ठेविले आपुल्यापाशी
उपासनीला, ब्रह्म दाविशी
अनाथांना तू घास भरविशी।
अंतर ठेवू नको रे नाथा
मजसी पाव रे आता,
माझ्या सद्‌गुरू साईनाथा

**– मुकेश कुलकर्णी,** खंडवा (म.प्र.).

## श्री साईंचा दरबार

साईंचा दरबार पाहिला
मी साईंचा दरबार
हिन्दु मुस्लिम शीख इसाई।
सर्वांचा कारभार ॥धृ०॥

गुण्या गोविंदे इथे नांदती।
विसरूनी आपुल्या जाती पाती।
निधर्मचि द्योतक बनती।
प्रचिती वारंवार ॥१॥

जो येतो तो नाम घेतो।
सच्चिदानंद साई म्हणतो।
अल्ला मालिक तोची होतो।
चिंता सर्व दूर करितो।
महिमा अपरंपार ॥२॥

**– रत्नाकर द. पाटील,** पुणे.

## साक्षात कुबेर

ब्रह्मांडनायका, साक्षात कुबेरा
मी तूज काय देऊ नाथा ॥धृ०॥

जे आहे ते तुझेच सारे
मी तर किंचित पामर नाथा ॥१॥

जोडोनिया कर नम्रभावे शीर
टेकियले चरणी साईनाथा ॥२॥

साधीभोळी भक्ती परि मनी शुद्ध
अर्पियली चरणी साईनाथा ॥३॥

उद्धरण्या मज ठेव शिरी हात
नित्य रहा "मधुपाठी" साईनाथा ॥४॥

– सौ. मधु गायकवाड, नवीन पनवेल.

## पसायदान

नको ऐसे मोठेपण ।
देई जे मनाला ताण ।
पायीची वहाण ।
साई होईन मी तुझ्या ॥

नको मला ती समृद्धी ।
पोटी जिच्या द्वेषबुद्धी ।
देई सकला सद्बुद्धी ।
सारे तुझ्या हाती ॥

नको मला हेवेदावे ।
मुखी तुझे नाम घ्यावे ।
तव चिंतनी रमावे ।
सदासर्वकाळ ॥

मागे एक माझे मन ।
सुखी ठेव अवघे जन ।
हेच दे पसायदान ।
नको दुजे काही ॥

– डॉ. मनोज वराडे, मुंबई.




लाभले मज सर्व सुख
तुजपाशी मी न मागिता ॥

शिरडीस लागता पाय
टळले सर्व अपाय
राहिली न कसलीही
आशा अन्यथा
साई तूच माझी माऊली
तुम्हीच माझे पिता ॥

समाधी बाबांची
तिचा महिमा तो न्यारा
चढता पायरी वाहे
सुख समृद्धीचा वारा
दुःख ते हरले
न राहिली व्यथा
साई तूच माझी माऊली
तुम्हीच माझे पिता ॥

शरण बाबांसी येता
न कुणी वाया जाईल भक्त
विसरूनी वाममार्ग
होईल पापमुक्त
बाबा तयांचा भार
वाहतील सर्वथा
साई तूच माझी माऊली
तुम्हीच माझे पिता ॥

– विवेक यशवंत माळी, परळ, मुंबई.

## तूच माझी माऊली

साई तूच माझी माऊली
तुम्हीच माझे पिता

## गीत साई

"पुढे उभे साई, मागे उभे साई"
ध्यानी मनी साई, स्वप्नी दिसे साई ।



## साई वंदना



हृदयात साई, चराचरी आहे माझा साई ॥
माझा देव साई, तुझा देव साई ।
माझ्याकडे, तुझ्याकडे पाहून आशिर्वाद देई ॥१॥

ॐ साई, श्री साई, अल्ला साई, मौला साई ।
राम साई, श्याम साई, सबका मालिक आहे माझा साई ॥
माझा देव साई, तुझा देव साई ।
माझ्याकडे, तुझ्याकडे पाहून आशिर्वाद देई ॥२॥

भक्तांची माऊली, गरिबांची साऊली ।
अनाथांचा कैवारी आहे माझा साई ॥
माझा देव साई, तुझा देव साई ॥
माझा देव साई, तुझा देव साई ।
माझ्याकडे, तुझ्याकडे पाहून आशिर्वाद देई ॥३॥

डोक्यावरी रूमाल, अंगात आहे कफनी ।
खांद्यावरी झोळी, शिरडीचा राजा आहे माझा साई ॥
माझा देव साई, तुझा देव साई ।
माझ्याकडे, तुझ्याकडे पाहून आशिर्वाद देई ॥४॥

लिहू किती कथा, गाऊ किती गाथा ।
शिरडीच्या साईनाथा, तूच आहे अमुचा दाता ॥
माझा देव साई, तुझा देव साई ।
माझ्याकडे, तुझ्याकडे पाहून आशिर्वाद देई ॥५॥

– **अविनाश पाध्ये**, बोरिवली.

## सांभाळतो आम्हां शिरडीचा साई...

चाल : बाकी कुछ बचा तो महंगाई....
(फिल्म : रोटी, कपडा और मकान)

भक्तांनो ऐका साईची नवलाई
सांभाळतो आम्हा शिरडीचा साई.... ॥धृ०॥

शिरडीच्या साईचे रूप देखणे
अंगावर कफनी डोई मुंडासे....
लक्ष्मीच्या द्वारी,
उभा राही साई, सांभाळतो ॥१॥

खंडोबा देवळातले, म्हाळसापती बोले
लिला करण्यास, माझे साई आले....
वंदन तव करूनी,
उच्चार होई साई, सांभाळतो.... ॥२॥

संकटात बाबा साई धाव घेई
जैसे गाय वासरास्तव धावत येई....
दिसे ठाई ठाई,
माझा हा साई.... सांभाळतो.... ॥३॥

समाधिस्त झाली, साई माऊली
परि गुण आहे समाधी मंदिरी....
'अनुसूत' हृदयी,
असे माझा साई.... सांभाळतो.... ॥४॥

– **दीपक रामचंद्र उदावंत (अनुसूत)**, नागपूर.

## साई तुझ्या दारी आलो

साई तुझ्या दारी आलो
साईमय झालो
मंगलमय झालो साई
साईमय झालो

मृत्यूच्या त्या वादळात
किती त्रस्त झालो
मनात अशांती साई
शांतीसाठी आलो

निराधार झालो साई
निराधार झालो
साई तुझ्या दर्शनाने
धन्य धन्य झालो

साई तुझ्या दारी आलो
साईमय झालो
प्रकाशाने न्हालो साई
प्रकाशाने न्हालो

**– अविनाश पौनीकर,** चंद्रपूर.

# आज मी साईघरी आलो

साईनाथाचे रूप पाहता
एकरूप झालो
आज मी साईघरी आलो ॥धृ०॥

शिरडी पावन आज पाहिली
साईदर्शनी वृत्ती रंगली
भक्तिगीताच्या जुळल्या ओळी
आनंदाने मीही नाचलो ॥१॥

साईलीलातील अर्थ उमजला
भावभक्तीच्या लहरी उठल्या
आत्मसुखाचा प्रत्यय आला
'मी'पण माझे विसरूनी गेलो ॥२॥

धन्य साई तो शिरडी त्यांची
माणुसकीचे सुंदर दर्शन
साईचरणी माझे वंदन
साईभजनी मीही रंगलो ॥३॥

**– प्रा. योगेश्वर अभ्यंकर**




# दूत

जगात जिकडे, तिकडे, एकच माणूस अपुली जात
मानवतेच्या कल्याणास्तव, सहकार्याचा हात –

कुणी आंधळा, कुणी पांगळा, त्याची होवून काठी
माणूस राहे, तुझ्या माणसा सदा पुढे अन् पाठी
धर्म, पंथ अन् पक्ष वेगळा, हवा कशाला वाद –

एकच अपुल्या रक्तमांसांतून एकच चाले श्वास
मानवरूपे भरवि ईश्वर मुखात सगळ्या घांस –
या श्रद्धेचा ध्यान घेवुनि वागु या जगतात –

माणूस आहे जगात केवळ माणसास आधार
असेल तेथे ज्योत विवेके दूर करू अंधार
अनंत कोटी ब्रह्मांडाचा होत दूत साक्षात –

**– दत्तात्रय जयवंत जोशी,** पुणे.

# सत्संगाचे महिमान

सत्संगाचे महिमान निर्दळी समूळ देहाभिमान
सत्संगापरते नसेना पाहाता अन्य साधन ॥

सत्संगे नासे देहाभिमान सत्संगे तुटे जन्ममरण
सत्संगे भेटे चैतन्यघन करा साईनाथांचे स्मरण ॥

सत्संग पतितपावन सत्संग करी आनंदसंपन्न
सत्संगे कृतकल्याण सत्संगे अज्ञाननिरसन ॥

सत्संग पुण्यपावन सत्संगे होई सुखसंपन्न
सत्संगे शुद्ध अंतःकरण करा बाबांशी अभिवंदन ॥

सत्संगे ईष्टप्राप्ती समाधान सत्संगे अनिष्ट निर्दळण
सत्संगे जीवन तृप्त परिपूर्ण सत्संगे निधान संपन्न ॥

सत्संगे होऊनी प्रसन्न स्वस्थ श्रद्धायुक्त करूनी मन
श्रद्धा सबुरी सहवर्तमान व्हावे साईभक्तिपरायण ॥

साई साईति नामस्मरणे लाभे सौख्य समाधान
नासे ताप दुःख दैन्य चित्त होई आनंदघन ॥

साईबाबा करुणासागर दयाघन पावेल ब्रह्मसनातन
जाता त्यांशी अनन्य शरण होई भक्तांचे कोटकल्याण ॥

– **शकुंतला खोले,** सातारा.

## श्री साई समर्था

साईनाथा, समर्था,
आज मी आलो तुझ्या दर्शनाला ।
तुझ्याविणा कुणाची साथ मिळणार
सांग इथे गरीबाला ॥धृ०॥

स्वार्थाची सारी ही दुनियादारी ।
कुणी सावज तर कुणी शिकारी ॥
चालतीचे भलते अशा बाजारी ।
पडतीचा तूची तू साह्यकारी ॥
तूच देवा, आम्हा आधार,
सदोदित भाविकाला ॥१॥

अशा जगतासी मी राहू कसा ।
अन्याय सदा मी साहू कसा ॥
आशेने कुणा मी पाहू कसा ।
भक्तित तुझ्या मी न्हावू कसा ॥
तुजविणा कुणासी
हाक मारणार तारण्याला ॥२॥

पंढरीदासा, तुझा भरवसा ।
तुजविण कुठे मी जावू कसा ॥
अभाग्यासी भाग्याचा तू दिलासा ।
तुझेची आम्ही तरी तू असा ॥
कुठवरी थांबू देवा,
जीव आता कंठी आला ॥३॥

– **पंढरीनाथ खर्डेकर,** यवतमाळ.

## श्री साईस्तवन

सत्यम् शिवम् सुंदरम्,
रूप तुझे साईनाथा ।
तव चरणी ठेवियला माथा ।
कृपा करी दिनावरी आता ॥

शारीरिक मानसिक आधी व्याधी ।
अन् अन्य समस्या
समूळ दूर करोनी ।
अखंड तव भक्ती करण्या शक्ती दे
तव दासा श्री साईनाथा ।
आरती नारायणा सच्चिदानंदघना ।
साई येऊ द्या करुणा ।
तव ठायीं वारंवार, वारंवार ।
दण्डवत घालू श्री साईनाथा

– **श्री. बंधुकांत नाईक,** सिंधुदुर्ग.




## संसार करी सुखदायी

संसार करी सुखदायी
गुरुवरा ! दत्तात्रया !!
मागणे अन्य नसे काही ॥धृ०॥

तुला समजते सारे देवा
तुझी करू द्या अखंड सेवा
विटलेले मन प्रसन्न करी बा
बळ मजला देई ॥१॥

कमंडलूतिल शिंपुन पाणी
झोळीमधले घास देऊनी
तुझ्या कृपेचा पुर्ण चंद्रमा
यावा माझ्या गेहीं ॥२॥

हा गाभारा या देहाचा
पहा सजविला सुंदर कैसा
दत्त दत्त या नामावाचुन
ध्यास नसे काही ॥३॥

– **गिरीबाल**


# साईउवाच

## साईचे बोल होती ना फोल

अध्याय ७ आणि ८ वा — संग्राहक : प्र. का. सोमण

(निवृत्त लेफ्टनंट कर्नल)

*(मागील अंकावरून पुढे)*



### पार्श्वभूमी

एकदा धगधगत्या 'धुनीत' बाबांनी अचानकपणे हात घातला व त्यांचा हात खूपच मोठ्या प्रमाणात भाजून निघाला. ते सारे वर्णन आपण अण्णासाहेब दाभोलकरांच्या शब्दांतच ऐकूया : "सन १९१० साली। धनत्रयोदशीचे दिवशी। बाबा सहज धुनीजवळी। बैसले जाळीत लाकडे ॥७३॥ प्रखर तेवली होती धुनी। निजहस्त त्यांतच खुपसोनी। बाबा बैसले निश्चिंत मनी। हात भाजोनि निघाला ॥७४॥ (तेव्हा बाबांना भक्तांनी बाबांच्या कमरेला घट्ट विळखा घालून मागे ओढले. श्यामा – बाबांचा अत्यंत लाडका भक्त म्हणाला, "हा... हा... देवा, हे काय केले." तेव्हा बाबा ध्यानावर आले व म्हणाले,

"एक पोर रे खाकेचे निसटले।
भट्टींत पडले एकाकी ॥७७॥

ऐकोनि निजपतीच्या हाके।
लोहाराची रांड रे धाके।
मारुनी आपुल्या पोरासी खांके।
भाता फुंके भट्टीचा ॥७८॥


फुंकता फुंकता लक्ष चुकली।
खांकेसि पोर हे ती विसरली।
पोर ती अचपळ तेथून निसटली।
पडताच उचलली मी श्यामा ॥७९॥

काढावयास त्या पोरीला।
गेलों तो हा प्रकार घडला।
भाजू दे रे हा हात मेला।
प्राण रे वाचला पोरीचा ॥८०॥

आता बाबांच्या या भाजलेल्या हाताचे दुखणे वाढायला नको म्हणून श्यामाने व चांदोरकरांनी "परमानंद" नावाचे प्रसिद्ध डॉक्टर शिरडीस आणले. पण अखेरपर्यंत बाबांनी त्यांना आपला हात दाखविलाच नाही. अखेर ते डॉक्टर कंटाळून परत गेले. पण बाबांचा निस्सीम भक्त, रक्तपितीचा आजार असलेला, भागोजी शिंदे करकचून बाबांच्या भाजक्या हातावर चिंध्या गुंडाळायचा व त्यानेच हात पूर्ण बरा झाला !! बाबांची सर्वज्ञता पाहा !! कोठे ती भट्टी, तींत ती पोर पडली, पण बाबांनी शिरडीत धुनीत हात घालून तिला वाचविली !! आहे की नाही हे सारे अतर्क्य !!)

पार्श्वभूमी

**सा**ईनाथांच्या लीला खरोखरच अवर्णनीय आहेत. एकदा शिरडी गावांत प्लेगची साथ आली म्हणून तेथे जबरदस्त भीतीचे वातावरण पसरले. खासतर स्त्रियांना, त्यांची मुले आजारी झाली की त्यांचे धाबे दणाणायचे. त्याचवेळी बाबांचे अमरावतीचे फार थोर भक्त श्री. दादासाहेब खापर्डे, जे लजिस्लेटिव्ह असेंब्लीचे मेंबर होते, ते सहकुटुंब बाबांच्या दर्शनासाठी शिरडीत वास्तव्य करून होते. अशा स्थितीत त्यांचा लहान मुलगा तापाने फणफणला व सौ. खापर्डे मनाने अत्यंत अस्वस्थ झाल्या. त्यांच्या मनात आले की त्या मुलाला घेऊन परत अमरावतीस गेल्या तर सारी काळजी दूर होईल म्हणून त्या बाबांना भेटण्याच्या संधीची वाट पाहात राहिल्या. बाबा सायंकाळची फेरी उरकून श्री. साठेवाड्याशी येताक्षणीच सौ. खापर्डे पुढे सरसावल्या; बाबांचे पाय धरले व त्यांच्या कानावर सारी हकिगत घातली आणि अमरावतीस मुलासह परत जाण्याची त्यांनी परवानगी मागितली. बाबा मृदूवचनी तिला आधार देत म्हणाले :



**''आभाळ आले आहे जाण।**
**पडेल पाऊस पीक पिकोन।**
**आभाळ वितळून जाईल ॥१०६॥**
**(म्हणजे आजारास उतार पडेल)**

**भींता किमर्थ'' (ऐसे वदून।**
**कफनी कमरेपर्यंत उचलून।**
**दाविते झाले सकळा लागुन।**
**ग्रंथी खटवून उठलेल्या ॥१०७॥**

**कुक्कुरीच्या अंड्याएवढे।**
**चार ग्रंथी चोहींकडे।**
**म्हणती) ''पाहा हे भोगणे पडे।**
**तुमचे सांकडे मजलागीं'' ॥१०८॥**

श्री. अण्णासाहेब दाभोलकर पुढे म्हणतात :

**हे दिव्य आणि अलौकिक।**
**कर्म पाहून विस्मित लोक।**
**भक्तालागी दु:खेही कैक।**
**भोगिती अनेक संत कैसीं ॥१०९॥**

**मेणाहुनी मऊ चित्त।**
**सबाह्य जैसे नवनीत।**
**लाभेवीण भक्तासी प्रीत।**
**भक्तचि गणगोत जयाचे ॥११०॥**

पार्श्वभूमी

**अ**साच एक अद्‌भुत किस्सा नंदूरबारच्या एका थोर साईभक्ताचे बाबतीत घडला. त्या भक्ताचे नाव होते नानासाहेब चांदोरकर. नानासाहेबांची सरकारी नोकरी होती. त्यांची बदली ''भूवैकुंठप्रती'' म्हणजे पंढरपूरला मामलेदार या पदावर झाली. नानासाहेबांना खूपच आनंद झाला. त्यांना शिरडी म्हणजेच पंढरपूर होते व त्यांच्यासाठी साईनाथ प्रत्यक्ष विठ्ठलाचे जागी होते. म्हणून त्यांनी सर्वप्रथम शिरडीस जाण्याचा बेत केला. तेथे बाबांचे दर्शन घेऊन पुढे पंढरपूरास रवाना व्हायचे हे त्यांनी मनाशी ठरविले.

पण हा आपला बेत त्यांनी कोणाही आप्तजनांना अगर मित्रमंडळींना कळविला नाही. साऱ्या सामानासुमानाची आवराआवर केली व ते शिरडीस मार्गस्थ झाले. जगाला कळले नाही म्हणून त्रिकालज्ञानी बाबांपासून नानासाहेबांचा हा बेत थोडाच लपून राहाणे शक्य होते !!



नानासाहेब शिरडीपासून काही मैल दूर असलेल्या ''निमगांवचे वेशीवर'' पोहोचले असतील नसतील, तो शिरडीत एक चमत्कार झाला ! त्यावेळी बाबांचे अत्यंत जवळचे भक्त म्हणजे म्हाळसापती, अप्पा शिंदे, काशीराम हे बाबांबरोबर मशिदीत होते. त्यावेळी बाबांनी अचानकपणे त्या सर्वांना सांगितल की ''पंढरीचे दरवाजे आत्ताच उघडले आहेत व आपण सारे मौजेने भजन म्हणू.'' नानासाहेब शिवेच्या ओढ्याजवळ - म्हणजे अगदी शिरडीजवळ पोहोचले आणि बाबांना फार मोठी ''भजनोल्लासता'' निर्माण झाली व त्यांनी स्वत: भजन म्हणायला सुरूवात केली ती अशी :

**''पंढरपुरला जायाचे जायाचे ।**
**तिथेच मजला राह्याचे ।**
**तिथेच मजला राह्याचे राह्याचे ।**
**घर ते माझ्या रायाचे ॥''**

बाबांबरोबर ते तिघेही भक्त मोठ्या भक्तिभावाने भजनात प्रेमाने रंगून गेले. तेवढ्यात नानासाहेबही मशिदीत पोहोचले. त्यांनी सहकुटुंब बाबांचे कमलचरणांवर डोई ठेविली व बाबांना अतीनम्र विनंती केली की त्यांच्याबरोबर बाबांनी पंढरपुरास जावे व तेथेच ''निवांत निश्चिंत बैसावे.''

जमलेल्या भक्तांनी मग नानासाहेबांना सांगितले की बाबांना या आमंत्रणाची गरजच नाही. त्यांनी स्वत:हून पंढरीरायाचे भजन गाऊन येथेच पंढरीचा देखावा निर्माण केला आहे.

महान भक्ताला भेटण्यासाठी व त्याचे कोडकौतुक करण्यासाठी स्वत: देवही किती उल्हसित असतो हे या नानासाहेबांच्या शिरडीच्या आगमनाने आपणास पाहायला मिळाले. बाबांनी गायलेल्या भजनाच्या ओळी पाहा. नानासाहेबांना ज्याप्रकारे यापुढे राहायला लागणार होते त्या

पंढरपुरच्या नावासह, बाबांनी भजनात ते वर्णन केले. असे बाबांचे प्रिय भक्त होण्याचा, आपण समस्त साईभक्तांनी मनापासून प्रयत्न करायला हवा, नाही का ?

**शुभंकर अध्याय सातवा समाप्त ।**
**ॐ श्री साईराम चरणार्पणमस्तु ॥**

## अध्याय ८ वा

**पार्श्वभूमी**

जे मोठमोठे ग्रंथ वाचून माणसाला मिळणार नाही ते साधुसंतांचे एका कृपाशीर्वादाने मिळून जाते. संत सामान्य जीवाला बंधमुक्त करून मोठे सुख देतात. असे हे कृपावंत साईनाथ, भक्तांचे उद्धारास सतत तत्पर असत. ते प्रत्यक्ष भगवंताची मूर्तीच होते, ज्यांना सुखदु:ख, शोक, निंदास्तुती स्पर्शच करू शकत नव्हते. ते क्षणात रावाचा रंक व रंकाचा राव करण्याची क्षमता राखीत होते; पण एवढा अधिकार असूनसुद्धा, ते खांद्यावर भिक्षेची झोळी टाकून दारोदारी हिंडत व भिक्षेकरी होऊन...

**''पोरी आण गे चतुकर भाकरी''**
**म्हणून पसरी निजकर ॥९२॥**

**घेई टमरेल एके करी ।**
**दुजिये हाती चौपदरी ।**
**स्वये फिरे दारोदारी ।**
**नियमित घरी प्रतिदिन ॥९३॥**

जे त्रिभूवनाचे स्वामी, अशा बाबांचे स्वत:चे जीवन भिक्षा मागून राहाण्याचे होते.

**भिक्षातरी काय नियमित ।**
**इच्छेस येईल तेव्हा मागत ।**
**कधी बारावेळ एक दिवसांत ।**
**भिक्षेस जात गावात ॥९७॥**

**एणेपरी जे अन्न आणीत ।**
**मशीदींत कुंडीत ठेवीत ।**
**कावळे कुत्रे त्यांतचि खात ।**
**कधी न हाकीत तयांना ॥१००॥**

**पार्श्वभूमी**

अशा या शिरडीसारख्या लहानशा खेड्यांतसुद्धा काही भाग्यवान होते ज्यांना बाबांचे देवत्व व महिमा कळला होता. अशा महान भक्तांपैकी एक होती बायजाबाई. तिने रोज बाबांसाठी भाकऱ्या बनवून त्या टोपलीत घालाव्या व डोक्यावर घेऊन, बाबांच्या शोधात ''कोस कोस'' रान धुंडावे; दाट झाडेझुडुपे तुडवावी; अशा स्थितीत, बाबांना कधी ओढ्याच्या काठी अगर एखाद्या झाडाखाली रानात बसलेले पाहून त्यांजजवळ जावे व ओली कोरडी भाजी भाकर ''दुपारीतिपारी'' बाबांना भरवावी. बायजाबाईच्या सत्वाची थोरवी आपण काय वर्णावी !! बाबांनी ध्यानांत असावे; बायजाबाईने पान मांडावे व प्रयत्नपूर्वक बाबांना खावववे. अशावेळी बाबा म्हणत -

**''फकीरी अव्वल बादशाही ।**
**फिकीरीही चिरंतन राही ।**
**अमीरी क्षणभंगूर पाही''**
**सदा बाबांनी म्हणावे ॥११२॥**

**पुढे बाबांनी रान त्यागिले ।**
**गावांत येऊन राहू लागले ।**
**मशीदींत अन्न खाऊ आदरिले ।**
**कष्ट चुकविले आईचे ॥११३॥**

अशी होती महान साईभक्त बायजाबाईची बाबांवर श्रद्धा व निष्ठा आपण सर्वांनी बायजाबाईच्या भक्तिप्रेमाचे अनुकरण करून साईनाथांचे आवडते होण्याचा प्रयत्न करूया. यातच साईभक्तांचे कल्याण साठविलेले आहे, नाही का ?)

**शुभंकर अध्याय आठवा समाप्त ।**
**ॐ श्री साईराम चरणार्पणमस्तु ॥**

ग्रंथ परिचय

# नाथभागवतातील भक्तिवर्म

## श्रेष्ठ भक्तिची महती सांगणारा ग्रंथ

– सौ. भारती देशमुख

सोलापूर येथील संतवाङ्मयाचे गाढे अभ्यासक, लेखक आणि श्री. गुरुदेव रानडे यांच्या परंपरेतील चिंतनशील साधक प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे हे सर्वपरिचित आहेत. संतसाहित्यावर त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. लेखनाद्वारे त्यांनी आपले भक्तिप्रसाराचे कार्य अविरत चालू ठेवले आहे. नुकताच त्यांचा 'नाथभागवतातील भक्तिवर्म' हा ग्रंथ प्रकाशित झाला आहे. श्री. कुंटे यांनी 'लोकमत' या दैनिकात लिहिलेल्या लेखांचे हे संकलन आहे.




महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे तसेच इथे अनेक पंथ आणि संप्रदाय आजही अस्तित्वात आहेत, जसे महानुभाव पंथ, समर्थ संप्रदाय, वारकरी संप्रदाय इ. त्यापैकी वारकरी संप्रदायाची मोठी परंपरा आपल्याकडे आहे. संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ आणि तुकाराम या संतांची वैभवशाली परंपरा या संप्रदायाला लाभली आहे. सर्वसामान्य माणसांना अनुसरता येईल असा सुलभ भक्तिमार्ग या संतांनी सांगितला. प्रपंचात राहूनच परमार्थ करा, परमार्थासाठी सांसारिक निवृत्तीची गरज नाही, असा संदेश या संतांनी दिला आहे. प्रपंच व परमार्थ यांचा समन्वय आणि समतोल कसा साधावा याचे आदर्श उदाहरण म्हणजे संत एकनाथ होय !

संत एकनाथांनी चतुःश्लोकी भागवत, नाथभागवत, रुक्मिणी स्वयंवर, भावार्थ रामायण हे मुख्य ग्रंथ लिहिले. त्यापैकी त्यांचा नाथभागवत हा ग्रंथ खूपच मोठा आहे. मूळ भागवताच्या बारा स्कंदापैकी अकरावा स्कंद नाथांनी मराठीत अनुवादित केला. त्यावर भाष्य केले. त्यालाच 'उद्धवगीता' म्हणतात. हा ग्रंथ १८०० ओव्यांचा आहे. उद्धवाला भगवान श्रीकृष्णांनी केलेला उपदेश यात आहे. हा उपदेश श्रीकृष्ण उद्धव संवादरुपाने सिद्ध झाला आहे. भागवतात उद्धव हाही अर्जुनासारखाच प्रश्नकर्ता आहे, पण तो कर्तव्यातून पळून आलेला नाही तर भक्तिधर्माच्या जिज्ञासेने तो भगवान श्रीकृष्णाशी संवाद करतो.

भक्तियोग म्हणजे काय तर ईश्वराचे सतत असणारे नामानुसंधान. स्मरण हीच साधना. ईश्वराचे अधिष्ठान ठेवून विहीत कर्मे केली तर प्रपंच सुखावह होतो आणि मन परमार्थात व्यग्र झाल्याने ईश्वरानुसंधानाने आनंद प्राप्त होतो. कलियुगात नामानेच विघ्ने दूर होतील. नामानेच ईश्वराची प्राप्ती होईल. तेव्हा सुखप्राप्तीसाठी अहर्निष नामस्मरण कर असेच भगवंतांनी उद्धवाला सांगितले आहे. नामाची महती उद्धवाला सांगताना ते म्हणतात, ''कठोर कर्म-कांडाने ईश्वराची प्राप्ती होत नाही. तुम्ही तुमची जी कर्मे आहेत ती अंत:करणपूर्वक करा आणि ती करताना ईश्वराचे सतत स्मरण करा. म्हणजे तुमचे अंत:करण शुद्ध होईल आणि अंत:करण शुद्ध झाले की, तुमच्या हातून सत्कर्मेच घडतील. म्हणून नित्यनैमित्तिक कर्मे ही ईश्वरार्पण बुद्धीनेच करावीत. मनाला निर्मळ करणारे नाम हेच एक मुख्य साधन आहे.

आपले मन हे सर्वात महत्त्वाचे आहे. नाथांनी भक्तिवर्म सांगताना मनोव्यापारांचा विचार केला आहे. माणसाचे मन दिसत नसले तरी त्याचे व्यापार कळून येतात. हे मनोव्यापारच सुखदु:खाला कारणीभूत असतात. आपले मन चंचल आहे. या चंचल मनात चांगले विचार फार काळ टिकत नाहीत म्हणून ते मनात येताच तात्काळ कृती करायला हवी. मनाच्या स्थिरतेसाठी भक्ती हाच उपाय आहे. ही भक्ती कुठली तर नामस्मरण भक्ती ! नाथांचे भागवत हे श्रेष्ठ भक्तिचे स्वरुप सांगणारे आहे. ईश्वराचे नामस्मरण हीच श्रेष्ठ भक्ती. नामाचे अनुसंधान नसेल तर स्नान, संध्या, जप, होम, दान ही सर्व कर्मे व्यर्थ आहेत. ईश्वराकडे जाण्याचे दोन मार्ग आहेत. एक ज्ञानमार्ग व दुसरा भक्तिमार्ग. त्यापैकी भक्तिमार्ग हाच सुलभ आहे असे श्रीकृष्णांनीच उद्धवाला सांगितले आहे. नामस्मरणाने विघ्ने दूर होतात. ''नामे तिन्ही लोक उद्धरती'', ''कलियुगी उद्धार हरिच्या नामे'' ही नामाचे महत्त्व वर्णन करणारी संतवचने प्रसिद्ध आहेत. नामस्मरण श्रद्धापूर्वक करायला हवे. श्रद्धा नसेल तर सर्व व्यर्थ आहे. तसेच भक्तिमार्गात साधकाने सदैव नम्रच असावे. भक्ताचा मीपणा आणि ज्ञानाचा अहंकार हा भक्तिमार्गातील सर्वात मोठा अडसर

आहे. अनन्यभक्तिने ईश्वराला शरण गेले तर तो आपला योगक्षेमही चालवितो.

परमार्थात सद्‌गुरुंचे महत्त्व फार मोठे आहे. 'गुरुविण कोण दाखवेल वाट ?' असे अनेक संतांनी म्हटले आहे. सद्‌गुरु कोण तर साधकाला मार्ग दाखवितो तो सद्‌गुरु. नाथांनी सद्‌गुरुंची आवश्यकता का व कशी आहे हे उदाहरणे देऊन पटवून दिले आहे. गुरु म्हणजेच ईश्वर असा दृढ विश्वास हवा. सद्‌गुरुकृपेनेच शिष्यांचा उद्धार होतो हे सत्य आहे.

आपण मनाने ध्यान करावे, जिव्हेने नामस्मरण करावे त्याला दृढ श्रद्धेची जोड द्यावी. सर्वांभूती (प्राणीमात्रातही) भगवंत पहावा, सत्संगती धरावी हेच एकनाथांनी नाथभागवतात सांगितलेले भक्तिवर्म आहे.

नाथभागवत हा मोठा ग्रंथ वाचणे सर्वसामान्य वाचकाला सहज शक्य नाही. नाथभागवतातील महत्त्वाचे काय तर त्यातील भक्तिवर्म आणि हे भक्तिवर्म सहजसोप्या भाषेत उलगडून दाखविण्याचे कार्य प्रा. कुंटे यांनी 'नाथभागवतातील भक्तिवर्म' या ग्रंथात केले आहे. हा ग्रंथ वाचताना जाणवते की, उद्धवाच्या मनातले प्रश्न अनेकदा आपल्याही मनात येतात, पण त्याची समाधानकारक उत्तरे आपल्याला मिळत नाहीत परंतु हा ग्रंथ वाचताना मात्र आपल्याला आपल्या प्रश्नांची उत्तरे मिळतात. नाथभागवतातील भक्तिवर्म उलगडून दाखविताना प्रा. कुंटे यांनी नाथभागवतातील अनेक ओव्यांचा भावार्थ दिला आहे व कंसामध्ये अध्याय आणि ओवी क्रमांक दिलेले आहेत. याऐवजी त्यांनी नाथभागवतातील मूळ ओव्या जशाच्या तशा ग्रंथात दिल्या असत्या तर ग्रंथाची पाने वाढली असती, पण वाचकांची अधिक सोय झाली असती, असे मला वाटते. असो. हा ग्रंथ वाचताना कुठेही क्लीष्टपणा जाणवत नाही. प्रा. कुंटे यांच्या लेखनाला नामसाधनेची जोड आहे. श्री. गुरुदेव रानडे यांचेही भक्ती, सद्‌गुरु यासंबंधीचे विचार त्यांनी यात सांगितले आहेत. संपूर्ण नाथभागवताचे सार सांगणारा हा ग्रंथ वाचनीय तर आहेच, पण संग्रही ठेवण्यासारखाच आहे. हा ग्रंथ लिहून प्रा. कुंटे यांनी संतसाहित्यविषयक लिखाणात मोलाची भर टाकली आहे.

तसेच श्रीसंत साहित्य सेवासंघ, सोलापूर या संस्थेने हा ग्रंथ प्रकाशित करून संतसाहित्याची सेवाच केली आहे.

**नाथभागवतातील भक्तिवर्म**
**प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे**
**प्रकाशक:** श्री संत साहित्य संघ, सोलापूर.
पाने : १७६ किंमत : २० रु.

# सुभाषितम्

**अनन्यासेन मरणं**
**विना दैन्येन जीवनम् ।**
**देहि मे कृपया देवा**
**त्वयि भक्तिं निरन्तरम् ॥**

या सुभाषिताप्रमाणे जीवन जगता आणि संपवता आले, तर त्याच्याइतकी भाग्याची गोष्ट नाही. या सुभाषिताचा अर्थ असा की, 'कष्ट न होता मृत्यू व्हावा, जीवनात याचना करण्याची वेळ येऊ नये. तसेच देवा, तुझ्या ठायीं, माझी दृढ भक्ती नित्य राहावी, कृपा करून देवा असे घडव.'

श्री. अमरेंद्र गाडगीळ म्हणतात - 'मनुष्य वृद्ध झाल्यावर त्रास न होता मरण यावे अशी प्रत्येकाची इच्छा असते. तसेच जोवर जगावयाचे तोवर याचना करू नये, एवढेच मागणे असते.'

सर्वसामान्य माणसाची किमान सुखाची ही कल्पना आहे. मानी व्यक्तीला याचनेचे दुःख मोठे वाटते. तसेच परावलंबी होऊन दुसऱ्याकडून सेवा करून घेण्यातही त्यांना कमीपणा वाटतो. म्हणूनच व्यवहारात प्रत्येकजण परमेश्वराजवळ विनासायासाचे मरण यावे अशीच प्रार्थना करतो.

थोर लोक हे नेहमी अयाचित वृत्तीचे असतात. सिंह भुकेला झाला तरी कधी गवत खाणार नाही. तेव्हा देवा, लाचारीचा प्रसंग कधीही आणू नकोस. जीवनात सदैव स्वाभिमानच फुललेला असो.

देवाची भक्ती ही फार महत्त्वाची आहे. प. पू. पांडुरंगशास्त्री आठवले यांचे आंदोलन हे भक्ती-आंदोलनच आहे. भक्तीतून शान्ति, भक्तीतून शक्ति हेच खरे.

हो, श्रीतुकाराम, समर्थांनीही भक्ती मागितलेली आहे. श्रीमारुतिरायांजवळ भक्तीच्या वाटा पुसलेल्या आहेत नि याचना नको असे म्हटलेले आहे. सद्‌भक्ताला विनासायास मरण प्राप्त होऊ शकते. तुकोबांनी म्हटले आहे -

**'तुका म्हणे तुज सोडवीना कोणी**
**एका चक्रपाणीवाचोनिया ।'**

**- सु. ह. जोशी,** शिरूर.

ग्रंथ परिचय

# सुभाषितांच्या साहित्य वैभवाचे सुंदर दर्शन



**संसार कटुवृक्षस्य द्वे फले ह्यमृतोपमे ।**
**सुभाषितरसास्वादः संगतिः सुजनैः सह ॥**
**संसाररूपी कटुवृक्षाची दोन फळे अमृतासम आहेत.**
**एका सुभाषितांचा रसास्वाद आणि दुसरे सज्जनांची संगती.**

संस्कृत भाषा ही भारतातील अनेक भाषांची जननी आहे. या भाषेला गौरवाने **'देवभाषा'** असेही म्हटले जाते. या भाषेतील अतुलनीय, नवरसांनी विद्‌ग्ध असे साहित्य विभव जगाच्या अन्य भाषेत क्वचितच असेल. 'अल्पाक्षरब्रह्म' असे वर्णन सार्थ ठरतील अशी या भाषेतील सुभाषितं, हे या भाषेचे एक वैशिष्ट्य आहे. या सुभाषितांच्या गुणवैशिष्ट्यांचे मनोहर, सुंदर, सुमधुर अशा शब्दलेण्याने करावे तेव्हढे वर्णन थोडेच आहे. या ग्रंथपरिचय लेखांच्या प्रारंभी दिलेले एक सुभाषित, सुभाषितांच्या अवघ्या गुणवैशिष्ट्याचे मूर्त रुप आहे. अशा या सुंदर, सुमधुर सुभाषितांचा रसास्वाद मराठी वाचकांना घेण्याची पूर्व संधी संस्कृत पंडित श्री. वा. ना. उत्पात यांच्या **'आस्वाद सुभाषितांचा'** या नुकत्याच प्रकाशित झालेल्या ग्रंथाने उपलब्ध झालेली आहे. राधानारायण प्रकाशन, पंढरपूर यांनी प्रकाशित केलेल्या १४६ पानी ग्रंथात वाचकांना २४७ सुभाषितांचा आस्वाद घेता येणार आहे.

सुभाषितांचे महात्म्य अनेकविध विशेषणांनी, रुपकांनी वर्णन केले जाते. एक कवी म्हणतो, ''अहो जगात तीनच रत्ने आहेत. पाणी, अन्न आणि सुभाषिते, बाकीची रत्ने म्हणजे दगड आहेत. मूर्ख लोक या दगडांनाच रत्ने हे नाव देतात.'' एक कवी सांगतो की, ''धर्म, न्याय, दक्षपण आणि सुभाषिते यांचा संग्रह असणारा राजा कधीच नाश पावत नाही'' आणि तो कवी पुढे एक गोष्ट सांगतो ती अशी -

एका राजाने आपल्या पंडितांना बोलावून विचारले, जगात निरुपयोगी वस्तू कोणत्या ? पंडिताने सांगितले 'डास व कोळीकिटकांचे जाळे'. पण सुभाषितकार म्हणतात जगात कोणतीच वस्तू निरुपयोगी नाही.


**चरेषु जातमात्रेषु वस्तुषु स्थावरेषु च ।**
**सफलं दृश्यते सर्वं विफलं नैव दृश्यते ॥**

''महाराज, सर्व सजीव निर्जीव सृष्टीत सर्वकाही उपयोगी आहे. निरुपयोगी काही नाही.'' राजाला सुभाषितकारांचे मत

(पृष्ठ क्र. ७६ वर)

ग्रंथ परिचय

# आत्मसिद्धी
## ज्ञानाचा अमृतकलश



**भरो शांतीने विश्व ।**
**व्हावे आध्यात्मिक विश्व ।**
**भक्ति, ज्ञान, प्रेम युक्त ।**
**व्हावे अखिल विश्व हे ।।**

स्वामी दत्तावधूत यांच्या या ओवीतून त्यांच्या जीवन कार्याचा व उद्दिष्टांचा अंदाज वाचकाला सहजपणे येऊ शकतो. बऱ्याच वेळा परमार्थ-अध्यात्म म्हणत म्हण त अनेक श्रद्धावान माणसे भलत्यांच्याच भजनी लागतात. असे आपण अनेक वेळा पाहतो, ऐकतो, वाचतो. अशा श्रद्धावानांनी कोणाच्या नादी लागण्यापूर्वी स्वामी दत्तावधूत यांचे 'आत्मसिद्धी' अर्थात ईश्वर प्राप्तीचा सुलभ मार्ग हे पुस्तक वाचावे व आपली श्रद्धा अधिक डोळस करावी.

स्वामी दत्तावधूत यांनी १९९१ मध्ये हिंदी मध्ये लिहिलेल्या ग्रंथाची, मराठी वाचकांची मागणी लक्षात घेऊन 'आत्मसिद्धी' ही मराठी आवृत्ती प्रकाशित करण्याचे कौतुकास्पद कार्य 'वनिता बुक्स' या प्रकाशन संस्थेने केलेले आहे. केवळ १५१ पानांचे छोटेखानी पुस्तक म्हणजे, 'गागर में सागर' म्हणताल तसा ज्ञानाने भरलेला अमृतकलशच आहे.

ग्रंथाचे दोन विभाग असून पहिल्या विभागात सहा व दुसऱ्या विभागात ११ विषय मांडलेले आहेत. सर्व विषय चढत्या क्रमाने वाचकाला एक एक गोष्ट समजून देत देत ज्ञानसंपन्न करणारे आहेत. वाचकांनी केवळ एकदा वाचण्याचे नव्हे तर संग्रही ठेवून प्रतिपाद्य विषय नीट समजून घेण्याचे त्याचे सिंचन करण्यासारखे हे पुस्तक आहे.

बऱ्याच वेळा पुरेशा माहिती अभावी भाविकभक्त विशिष्ट साधना आरंभ करतो आणि साधनेतील विघ्नांची कल्पना नसल्याने विघ्ने येताच साधना सोडून पलायन करतो असे आपण पाहतो. त्यामुळे स्वामी दत्तावधूनांनी आपल्या आत्मसिद्धी ग्रंथाचा प्रारंभच. 'साधन मार्गातील विघ्ने' या प्रकरणाने केलेला आहे.

मानव जन्माचे महत्त्व, सात्त्विकतेचे महत्त्व, परलोक जीवन अशी प्राथमिक माहिती पहिल्या भागात दिल्यानंतर दुसऱ्या भागामध्ये अधिक सूक्ष्म माहिती दिलेली आहे. 'आत्मप्रभेचा उष:काल' या प्रकरणात ग्रंथकर्ता म्हणतो, 'ज्याला फक्त आत्मज्ञानाच्या मार्गाने जावयाचे असेल त्याने हातात माळ घेऊन जप करण्याची अत्यंत आवश्यकता असते.' पुढील प्रकरणांमध्ये ४ खाणी, ४ देह, मनाच्या ४ अवस्था, आत्म्याच्या ४ अवस्था, बुद्धीचे प्रकार, ४ वाणी

प्रकार असा सूक्ष्म विचार लेखकांनी अत्यंत सोप्या, सुलभ भाषेने मांडलेला आहे. शेवटच्या प्रकरणात 'कायाकल्प सिद्धी'चे ४ प्रकार सांगितलेले आहेत. 'आपल्या महाराष्ट्रातील संतकथांमध्ये योगी चांगदेव १४०० वर्षे जगल्याचे सां गितले जाते व ऐकणाऱ्यास ही दंतकथा वा अतिशयोक्ती अलंकाराचा प्रकार वाटतो. पण चांगदेव खरोखरीच १४०० वर्षे जगले असतील याची 'कायाकल्प' प्रकरण वाचून खात्री वाटू लागते. अशा प्रकारे आपल्या मनातील अनेक शंका, संभ्रम, अज्ञान, विपरित ज्ञान दूर करून अनुभवजन्य सत्याचा प्रकाश निर्माण करणारा असा, हा आत्मसिद्धी ग्रंथ सर्वांनीच वाचणे गरजेचे आहे. या ज्ञानामुळे आपला परमार्थाच्या मार्गावरील प्रवास अधिक सोपा व अधिक सुखकारक होईल.

ग्रंथाची छपाई, बांधणी दर्जेदार आहे. ग्रंथाची १०० रु किंमत मात्र सर्वसामान्य भक्तभाविकांच्या आवाक्यातील वाटत नाही. आजकाल छपाई, कागद, विक्री कमिशन यांच्यातील भरमसाठ वाढीमुळे ग्रंथाची किंमत कमी ठेवणे अवघड झालेले आहे हे खरे असले तरी टी. व्हीच्या या युगात वाचनाची आवड व वाचकांची संख्या कमी-कमी होत आहे. त्यात ग्रंथाच्या किंमती हेही ग्रंथ खरेदी न करण्यात कारण होऊ नये. यासाठी सामाजिक बांधिलकी, समाजसेवा, परमार्थ प्रचार या हेतून कार्य करणाऱ्यांनी काही योजना काढल्या पाहिजेत. स्वस्तात ग्रंथ उपलब्ध करून देऊन तो लाखोंच्या संख्येने खपविला पाहिजे. या प्रचंड संख्येमुळे ग्रंथ निर्मितीचा खर्चही कमी होईल व ग्रंथ प्रचाराचा हेतूही साध्य होईल. अर्थात माझी ही सूचना विशिष्ट विचार प्रेरित अशा सर्वच प्रकाशकांना उद्देशून आहे. आणि या सूचनेमागेही आपले ग्रंथ व आपला विचार सर्वदूर प्रसारीत व्हावा हीच तळमळ आहे. केवळ उपदेश करण्याचा अहंभाव नाही हे प्रांजळपणे नमूद करावे वाटते. असो. स्वामी दत्तावधूत यांच्या अन्य ग्रंथांचा परिचय पुढील अंकात....

**आत्मसिद्धी**
**स्वामी दत्तावधूत**
वनिता बुक्स, कमानवाला चेंबर्स,
पी. एम. रोड, मुंबई - ४०० ००१.
**पृष्ठे :** १५२ **मूल्ये :** रु. १००

**– विद्यानंद**

---

*(सुभाषितांच्या.... पृष्ठ क्र. ७४ वरून)*

पटत नाही. पंडिताच्या सांगण्याप्रमाणे त्यास डास व कोळीकिटकांचे जाळे निरुपयोगी वाटते. पुढे एकदा त्या राजाच्या राज्यावर शत्रूंनी आक्रमण केले. तेव्हा जीव मुठीत धरून राजा कसाबसा पळून गेला. एका जुनाट वाड्यात त्याने आश्रय घेतला. रात्रभर राजास तेथील डासांमुळे झोप आली नाही तो जागाच राहिला. शत्रूचे सैन्य वाड्याकडे येत असल्याचे आवाजावरून त्याला समजले व तो वाड्यातून जवळ असलेल्या एका गुहेत जाऊन लपून बसला. शोध घेत सैन्य गुहेपर्यंत आले आणि त्यांनी गुहेच्या तोंडावर कोळ्याचे जाळे पाहिले आणि ही गुहा निर्मनुष्य आहे असे समजून निघून गेले. कोळ्याच्या जाळीजळमटामुळे आपण वाचलो हे राजाच्या लक्षात आले आणि त्यास सुभाषितकाराच्या **'सफलं दृश्यते सर्वं विफलं नैव दृश्यते'** जगात सर्वकाही उपयोगी आहे निरुपयोगी असे काही नाही, या सुभाषिताची आठवण झाली.

श्री. उत्पातशास्त्रींची शैली पुराणिकाची असल्याने रसाळ व प्रवाही आहे. ते शास्त्री असल्याने नव्या युगातील नव्या विज्ञानवादी पिढीलाही पटावे अशी त्यांची मांडणी आहे. आटोपशीर शैलीतील विवरण हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे. बाजारात सुभाषितांचा केवळ अर्थ सांगणारे ग्रंथ आहेत. या ग्रंथात आपणास अर्थाबरोबरच विवरण मिळते. वाचकांच्या


सोईचा-गरजेचा विचार करून २४७ सुभाषितांचे विविध विषयवार वर्गिकरण देण्यात आलेले आहे. तसेच आद्याक्षरानुसार सुभाषितांची सूचीही दिलेली आहे. ही सुभाषितांची मालिका सोलापूर तरुण भारतमध्ये गेली अनेक वर्षे साप्ताहिक सदर म्हणून प्रकाशित झालेली आहे. अशाप्रकारे वृत्तपत्रातील लेखांचा हा ग्रंथरूप अवतार असून नवोदित प्रवचनकार, कीर्तनकार, व्याख्याते, पालक आणि शिक्षक या सर्वांनाच यामुळे एक संदर्भग्रंथ लाभलेला आहे.

**– विद्यानंद**

**आस्वाद सुभाषितांचा**
**वा. ना. उत्पात**
राधानारायण प्रकाशन, २९३० पश्चिमद्वार, पंढरपूर.
पाने : १४६ मूल्य : रु. ८०/-

## शिरडी वृत्त

# श्री साईबाबा संस्थान शिरडीचे नवे कार्यकारी अधिकारी श्री. अजित पवार



श्री. अजित बाबुराव पवार यांनी श्री साईबाबा संस्थान शिरडीच्या कार्यकारी अधिकारी पदाची सूत्रे श्री. तु. गो. कासार यांच्याकडून दि. १ जुलै रोजी स्वीकारली असून त्यायोगे संस्थानला आपला वाढता अवाढव्य कारभार पाहण्यास पूर्णवेळ व विशेष अनुभवी असा कार्यकुशल अधिकारी लाभलेला आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या आळंदी-पंढरपूर पायी पालखी सोहळ्याचे प्रवर्तक थोर संत हैबतबाबा आरफळकर यांचे वंशज असलेल्या श्री. अजित पवार यांना बालपणापासून हरिभक्तीची विशेष आवड आहे. संतकुळात जन्म, बालपणापासून भक्तीची आवड आणि सात्त्विक स्वाभीमानी परोपकारी वृत्ती ही त्यांची वैशिष्टे आहेत. श्री साईलीला वाचकांसाठी आम्ही त्यांचा थोडक्यात परिचय देत आहोत.

पूर्णनाव : **अजितराव बाबुराव पवार (आरफळकर)**
जन्म : १५ डिसेंबर १९६३, आरफळ (जि. सातारा)
शिक्षण : एम्. एस्सी. (ॲग्री.), राहुरी विद्यापीठ

शालेय शिक्षण लोणंद येथे तर महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापूर येथे झाले. विशेष गुणवत्तेसह सर्व परीक्षा उत्तीर्ण ॲथलेटीक्समध्ये 'जनरल चॅम्पियन'.

सेवानुभव :
- ❑ कोईमतूर (तामिळनाडू) येथे 'फॉरेस्ट ऑफिसर' म्हणून नोकरीचा श्रीगणेशा.
- ❑ पोलिस उपनिरीक्षक परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम् ट्रेनिंगही पूर्ण केले.
- ❑ कोल्हापूर येथे कृषी अधिकारी.
- ❑ तहसिलदार, पन्हाळा (जि. कोल्हापूर)
- ❑ तहसिलदार, कराड (जि. सातारा)
- ❑ उपजिल्हाधिकारी(नागपूर)

**विशेष उल्लेखनीय कार्य :** ज्योतिबा देवस्थानचा (कोल्हापूर जिल्हा) जिल्हाधिकारी श्री. शिवाजीराव देशमुख आणि प्रांताधिकारी श्री. गौतम यांचे मार्गदर्शनाखाली 'सर्वांगीण विकास प्रकल्प' तयार केला. त्यानुसार विकास कामे पूर्ण केली.

या विकास प्रकल्पांची वैशिष्टे अशी -
(१) मंदिर अंतर्गत विकास-सुधारणा,
(२) नवी पाणी पुरवठा योजना,
(३) रस्ता रुंदीकरण,
(४) गावठाण विस्तार,
(५) वृक्षारोपण.

कार्यकारी अधिकारी पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर **श्री. पवार यांनी श्री साईलीला** प्रतिनिधीस सांगितले. की, 'मूळ भक्तीची आवड म्हणून पंढरपूर, शिरडी, गगनगिरी महाराज (गगनबावडे) या क्षेत्राच्या ठिकाणी काम करण्याची इच्छा होती आणि आज शिरडी संस्थानच्या कार्यकारी अधिकारीपदाची सूत्रे हाती घेऊन ती पूर्ण झाली आहे. साईभक्तांच्या अधिकाधिक सोईंना प्राधान्य हेच माझ्या कार्याचे मुख्य तत्त्व असेल.